दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -८३ | शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-83 | Friday, Dt.28 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# गेवराईत पवार पंडितांची बाळ युतीच ठरणार गोंडस

## विरोधकांचे दाभाडे बंद करून नुसतीच वाजणारी टिकटिक होणार शितल..!

गेवराई / विशेष प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेची निवडणूक आता जवळपास एकतर्फी झाली आहे. बाळराजे पवार यांच्या पाठीशी पुन्हा एकदा भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांनी भक्कमपणे दिलेला आशीर्वाद, माजी आमदार बदामराव पंडित यांची मिळालेली भक्कम साथ, रिपाईचे नेते पप्पू कागदे यांचे मिळालेले समर्थन आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिलेले पाठबळ आणखीनच जमेचे झाले आहे. विकासाच्या मुद्द्यावर पवारांचे निर्विवाद वर्चस्व गेवराईच्या नगरपालिकेवर राहणार आणि मतदारच विरोधकांचे दाभाडे बंद करून त्यांची वाजणारी नुसतीच टिकटिक शितल करत गेवराईकर विकासाचे पुन्हा एकदा गीत गातील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे केवळ सोशल मीडियावर वाटणारी चुरशीची लढत प्रत्यक्षात मात्र केव्हाच पंडित पवारांच्या बाजूने एकतर्फी झाल्यामुळे ही बाळ युतीच आपले वर्चस्व गेवराईवर सिद्ध करत जनतेचे राजे म्हणून बाजी मारतील यात शंका नाही.

गेवराई विधानसभा निवडणूक जिंकल्यामुळे माजी आमदार अमरसिंह पंडित, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांना आपणच पुन्हा एकदा गेवराईचे राजे आहोत असा भ्रम झाला आहे. मात्र गेवराईकरांच्या मनात काय आहे हे दोन तारखेला स्पष्ट होणार आहे. गेवराई नगरपालिकेचा विकास मागील दहा वर्षात भारतीय जनता पार्टीचे आमदार लक्ष्मण अण्णा पवार यांनी कशा पद्धतीने केला. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न प्रामाणिकपणे कसे सोडवले. हे गेवराईकरांनाच नाही तर तमाम बीड जिल्ह्याला देखील माहित आहे.भ्रष्टाचार करून नव्हे तर विकासाची कामे प्रत्यक्षात करून गेवराई शहरासह गेवराई मतदार संघाचा चेहरा पवार कुटुंबियांनी प्रामाणिकपणे बदलण्याचा प्रयत्न केला. विधानसभा निवडणुकीत झालेल्या राजकीय पेचामुळे लक्ष्मण अण्णांचा पराभव झाला. तो पराभव आजही गेवराईकरांना मनात शल्य म्हणून बोचत आहे. हे शल्य आता गेवराई नगरपालिकेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून गेवराईकर हे शल्य मनातून दूर करतील अशी शक्यता आहे.

गेवराई नगराध्यक्ष पदाची निवडणूक ही भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गट अशी राहिलेली नाही. तर गेवराईची सामान्य जनता आणि राजेशाही या विरुद्ध




असल्यामुळे या निवडणुकीत सर्वसामान्य जनतेच्या मदतीला कायम रस्त्यावर असलेले माजी मंत्री बदामराव पंडित आणि विकासाचे व्हिजन असलेले बाळराजे पवार आणि त्यांना खंबीरपणे साथ देणारे माजी आमदार लक्ष्मणांना पवार हे सामान्य मतदारांच्या मनामध्ये एक आपलं नेतृत्व म्हणून ठसा निर्माण करण्यात यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे जनतेच्या जे मनात आहे तेच मतपेटीतून व्यक्त होणार असल्यामुळे आज निवडणुकीमध्ये विरोधक सैरभैर आरोप करून या निवडणुकीत दिशाभूल करण्याचे काम करत असल्यामुळे त्यांचे दाभाडे जनताच मतपेटीतून बंद करून त्यांची नुसतीच वाजणारी टिकटिक देखील येत्या दोन तारखेला मतपेटीतून शांत म्हणजेच शितल करण्यासाठी गेवराईची जनता आता सज्ज झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होईल आणि नगराध्यक्ष पदावर अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पुन्हा एकदा विधानसभेनंतर विजय होईल असा जो भास निर्माण केला जात होता तो केवळ कागदावर असून प्रत्यक्षात मात्र गेवराईत भाजपाचे कमळ फुलणार असून पवार पंडितांची ही बाळ युतीच गोंडस युती म्हणून गेवराई नगरपालिकेवर राज्य करेल आणि गेवराईच्या विकासासह मतदारांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर राहील अशी शक्यता असल्यामुळे गेवराई मतदार संघात भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार गीता भाभी पवार या अवाजवी मताने विजयी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### नगरपालिकेत बसून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवणारे एकमेव आमदार होते लक्ष्मण पवार..!

आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी आपल्या दहा वर्षाच्या कालावधीत गेवराई मतदार संघाचा प्रामाणिक विकास केला. प्रामुख्याने त्यांनी गेवराई शहराकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले होते. ते स्वतः गेवराईच्या नगरपालिकेत जाऊन त्या ठिकाणी बसून जनतेचे प्रश्न सोडवत होते. हे समस्त गेवराईनेच नव्हे तर जिल्ह्याने पाहिलेले आहे, अनुभवलेले आहे. बीड जिल्ह्यातील एकही आमदार नित्यनियम नगरपालिकेत बसून सामान्य जनतेची कामे करत नसावीत हे वास्तव नाकारून चालणार नाही. या प्रामाणिक कामाला जनता मतपेटीतून साथ देईल अशी शक्यता आहे.

### गेवराईकर गाणार पुन्हा एकदा विकासाचेच गीत

गेवराई नगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गीता भाभी पवार याच खऱ्या अर्थाने विकास करू शकतील. केंद्रात आणि राज्यात भाजपाची निर्विवाद सत्ता आहे. भाजपा हा जातीयवादी नाही तर देश प्रेमी आणि विकासाचा आश्वासक चेहरा असल्यामुळे गेवराईतील सर्व जाती धर्मातील मतदारा जात पात पक्ष बाजूला ठेवून पवारांच्या पाठीशी उभे राहतील असे चित्र उभे राहिले आहे. गेवराईचे मतदार पुन्हा एकदा गीता भाभींच्या रूपाने विकासाचेच गीत गात गेवराईमध्ये कमळ फुलवतील यात शंका नाही.

# उमेदवार प्रेमलता पारवे माझ्या आई समान - शेख मुजीब

## भिमाच्या लेकीसाठी मिमचे बंदे तगडबंद

बीड /प्रतिनिधी

बीडच्या नगर परिषदेमध्ये सर्वच पक्षाचे उमेदवार अराजकीय आहेत वगळून तुतारी. राष्ट्रवादी पक्षाने नायब तहसिलदार म्हणून निवृत्त झालेल्या दलितमित्र मनोहर वंजारे यांच्या कन्या प्रेमलता पारवे यांना शेवटच्या घटकात घडी दिली. मुस्लिमांनी ज्या तुतारीला लोकसभेत, विधानसभेत गुलाल दिला त्या तुतारीने नगर परिषदेच्या निवडणुकीत मुस्लिमांच्या हातावर मात्र तुरी दिल्या. मुजीबच्या रुपात पारवे यांची उमेदवारी देण्याची कबुली आजी-माजी आमदारांनी दिलेली असताना ऐन वेशीत मुजीबच्या माथी नकार मारला. मात्र याचवेळी मुस्लिम नेत्यांनी त्यांच्या नेत्याकडे म्हणजे अजित पवार यांच्याकडे मुजीब यांचा प्रस्ताव सरकवला. राष्ट्रवादीने फारसा विचार न करता अल्पसंख्यांक समाज एकगठ्ठ्याने एका भिमाच्या लेकीसोबत राहणार असेल तर विजयाचे सोपे समीकरण शक्य आहे, म्हणूनच पारवे यांची उमेदवारी निश्चित झाली. आज त्या प्रेमलता पारवे यांच्यात आपण आपली आई पाहतो असे भावनिक उद्गार मुजीब यांनी केले आणि



आंबेडकरी चळवळीत मुजीब यांच्या वक्तव्याचे स्वागतही झाले. मुस्लिम एकवटले असले तरी ते काय मुस्लिम उमेदवाराला खुर्चीत बसविण्यासाठी नाही तर मुजीब यांनी आईचा दर्जा दिलेल्या भिमाच्या लेकीसाठी रणांगणात उतरले आहेत.

बीड नगर परिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्या प्रचारार्थ त्यांचे जावई संपादक शेख मुजीब यांनी मुस्लिम बहुल भागात विविध प्रभागात भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. शेख मुजीब यांनी मतदारांशी संवाद साधताना भावनिक होऊन आशिर्वाद मागितले. प्रेमलता पारवे या जरी माझ्या सासू असल्या तरी मी त्यांच्यात आई पाहतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या भिमाच्या लेकीला उमेदवारी जाहिर करून आंबेडकरी विचाराला चालना दिली आहे. आई समान असलेल्या प्रेमलता पारवे यांच्या विजयासाठी माझा मुस्लिम बांधव एकगठ्ठा माझ्या पाठिशी आहे आणि त्याबळावरच विजय निश्चित आहे असेही शेख मुजीब म्हणाले.

दरम्यान शेख मुजीब यांच्या वक्तव्याचे दलित आणि मुस्लिम समाजात स्वागत झाले असून दलित मतदारांसोबतच मुस्लिम मतदारही एकवटले आहेत. विरोधक कितीही आरोप करत असले तरी श्रीमती प्रेमलता पारवे यांनी प्रचारात घेतलेली आघाडी


(उर्वरीत पान २ वर)

# अजितदादा, तुमच्या राष्ट्रवादीचा उमेदवार स्वच्छ प्रतिमेचा नसून भ्रष्टाचारीच - राजू जोगदंड



बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत मोठा राजकीय स्फोट झाला आहे. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार प्रेमलता दादाराव पारवे या शासकीय सेवेत असताना ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्या गेल्या होत्या, असा थेट पुराव्यासह गंभीर आरोप रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी माध्यमांसमोर केला. यामुळे बीडमध्येच जाहीर सभेमध्ये दस्तूर खुद्द महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी



मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांचे न्यायालयात

कि.फौजदारी अर्ज क्र. /२०२१

आमचा उमेदवार स्वच्छ प्रतिमेचा आहे असा केलेला दावा खोटा ठरल्यामुळे जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात खळबळ उडाली आहे.

तब्बल चार दशकांनंतर मागासवर्गीय महिलेला बीड नगराध्यक्ष पदाचे आरक्षण मिळाले असताना, राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी लाचखोर व गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तीस उमेदवारी देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला, अशी टीका केली जात आहे. राजू जोगदंड यांनी सांगितले की, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी पूर्वीच उघड केले होते की, प्रेमलता पारवे यांच्यावर लाचखोरीचे गुन्हे नोंद आहेत आणि त्यांचे जावई मुजीब शेख यांच्यावरही गुन्हे आहेत. तरी देखील अजित पवारांनी नुकत्याच झालेल्या सभेत स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार दिल्याचा दावा करून जनतेची दिशाभूल

(उर्वरीत पान २ वर)

### फक्त ५०० रुपयाची लाच घेतल्या प्रकरणी प्रेमलता पारवेंवर दाखल झाला होता गुन्हा, त्याचे पुरावेच थेट सादर

### उमेदवार पारवे आणि त्यांचे जावई शेख मुजीब यांच्यावर असे आहेत गुन्हे दाखल

प्रेमलता दादाराव पारवे ह्या बीडच्या भू-संपादन कार्यालयात क्लार्क असतांना, एक किरकोळ ना हरकत प्रमाणपत्रासाठी त्यांनी सामान्य शेतकऱ्याकडून दि.२८/०५/२००३ साली ५०० रुपयांची लाच घेतली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन अटक केली होती. तसेच प्रेमलता पारवे व त्यांचा जावई मुजीब शेखवरही सध्या बीड कोर्टात ४२७,४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६,३४ केस सुरु आहेत. मग राष्ट्रवादीचे उमेदवार आणि त्यांचे जावई स्वच्छ प्रतिमेचे कसे ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# स्वार्थासाठी रंग बदलणाऱ्या विरोधकांना त्यांची जागा दाखवा - डॉ.ज्योतीताई मेटे

## नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्या प्रचारार्थ मतदारांशी साधला संवाद

बीड /प्रतिनिधी

नगर परिषदेच्या माध्यमातून क्षीरसागर परिवाराने गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहराला वेठीस धरले आहे. आपल्या स्वार्थी धोरणामुळे शहराची अवस्था बकाल झाली, वेळेवर प्यायला पाणी येत नाही, खड्ड्यात गेलेले रस्ते, गल्ली बोळात दुर्गंधी आहे, या प्रश्नांतून सुटका करून घेण्यासाठी नगर परिषद क्षीरसागर मुक्त करायची आहे. स्व. मेटे साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांचे विकासाचे व्हिजन राबवून बीड शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व प्रभागातील



उमेदवार घड्याळाच्या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करा आणि स्वार्थासाठी रंग बदलणाऱ्या विरोधकांना त्यांची जागा दाखवा असे आवाहन शिवसंग्रामूच्या राष्ट्रीय नेत्या डॉ.ज्योतीताई मेटे यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र. १, २, १५ व ११ मध्ये मतदारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शिवसेना - शिवसंग्राम - स.पा. आदी मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. २ मधील उमेदवार सौ. दिपालीताई किशोर धोत्रे, राहुल मधुकर शिनगारे तसेच प्रभाग क्र.१५ मधील डॉ.सुनिता प्रकाश काळे, पांडव अजिंक्य राजेंद्र, प्रभाग क्र. १ मधील धनंजय बाळासाहेब काळे व सौ. सविता भास्कर जाधव आणि प्रभाग क्र.११ मधील शेख फरहत बेगम नसीर व शेख मोहम्मद खालेद यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगरसेवक दिलीप गोरे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, बळीराम गवते, रात्नाकर काळे, अनिल घुमरे, निखील सवई, सुहास पाटील, भास्कर जाधव, शेख मुजीबभाई, भागवत तावरे, काझी रऊफ, काझी युसूफ, काझी नवाब, नजीबभाई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, बीड शहरात परिवर्तन करण्याची नामी संधी आपल्याला आलेली आहे. विकासाच्या मुद्यावर बीड नगर परिषद पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या ताब्यात द्या, अनेक वर्षे

(उर्वरीत पान २ वर)

# गेवराईत पवारांनी काय केलं म्हणणाऱ्या अमरसिंह पंडितांना जनता २ तारखेला मतपेटीतून उत्तर देईल - बाळराजे पवार

गेवराई (प्रतिनिधी) गेवराईत विकासाची खरी गंगा वाहिली ती पवारांच्या नेतृत्वातच. आम्ही काय केलं म्हणता ना तर आणांनी आणलेल्या दहा वर्षांच्या निधीचे आकडे सांगितले तर तुम्हाला त्याचा हिशोबही लावता येणार नाही. म्हणून आम्ही काय केलं असा सवाल विचारणाऱ्या अमरसिंह पंडितांना गेवराईची जनता येत्या २ तारखेला मतपेटीतून जबरदस्त उत्तर देईल असे प्रतिपादन भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले.

भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार तसेच प्रभाग क्रमांक ४ व ५ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ सावता नगर येथे पार पडलेल्या भव्य कॉर्नर सभेत भाजप नेते बाळराजे पवार यांनी अमरसिंह पंडित यांच्यावर झणझणीत टीका करत संपूर्ण वातावरण तापवले.

यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार, माजी मंत्री बदामराव पंडित, युध्दाजित पंडित, प्रा. पी.टी. चव्हाण, ॲड. भगवान घुंबार्डे, अमोल करांडे, बाबा पिसाळ, सचिन दाभाडे, यशराज पंडित, बाळासाहेब सानप, अरुण मस्के, अन्वरखा पठाण, सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर समेत अनेक मान्यवर उपस्थित होते.

सभेत पुढे बोलताना बाळराजे पवार म्हणाले, विकास हा आमचा धर्म; कामांची गुणवत्ता हेच आमचं उत्तर आहे. म्हणून मागील काळात केलेल्या विकासकामांच्या जोरावर जनता पुन्हा विश्वास

## सावता नगरच्या सभेत अमरसिंह पंडित यांच्यावर बाळराजे पवारांचा हल्लाबोल



दाखवत असून त्यामुळे काही जणांची पोटदुखी वाढल्याची टीका त्यांनी केली. गेवराई शहर जात-धर्माच्या राजकारणावर चालत नाही, सर्व गेवराईकर एकजूट आहेत, असेही ते म्हणाले.

अमरसिंह पंडित यांच्यावर गंभीर आरोप करत पवार म्हणाले,

(उर्वरीत पान २ वर)



## संपादकीय

# ‘व्हाईट वॉश’

‘इंग्लिश क्रिकेटचा मृत्यू झाला!’ क्रीडा पत्रकार रेगिनाल्ड शर्ली ब्रूक्स यांनी ‘द स्पोर्टिंग टाइम्स’ साप्ताहिकात १४३ वर्षांपूर्वी हे उपहासाने लिहिले. त्यांच्या या विनोदी ढंगातील मृत्युलेखातून ‘अ‍ॅशेस’चा जन्म झाला. भारतीय क्रिकेटसाठीही तीच वेळ आलेली दिसते. गुवाहाटीमध्ये दुसऱ्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विक्रमी धावांनी पराभूत झालेल्या या संघाच्या ‘कामगिरी’ची येते काही दिवस चिरफाड होत राहणार. वर्षभरातच घरच्या मैदानावर दोन संघांकडून न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका - भारताला ‘व्हाईट वॉश’ मिळाला. त्यामुळे आता रंगसफेदी नव्हे तर रंगरंगोटी आवश्यक आहे. मालिकेतील दुसऱ्या पराभवाची चाहूल सामन्याच्या चौथ्या दिवशीच लागली. परिणामी सामाजिक माध्यमांवर मिम्सचा महापूर सुरू झाला. ते पाणी आज डोक्यावरून गेले. इतिहासातील सर्वांत मोठा, म्हणजे ४०८ धावांनी पराभव. दक्षिण आफ्रिकेने दुसरा डाव थोडा लवकर घोषित केला असता, तर या पराभवाची नोंद कदाचित चौथ्या दिवशीच झाली असती. पराभवाचे अंतर थोडे कमी असले असते. पाहुण्यांनी डाव लवकर का घोषित केला नसावा? पत्रकारांनी विचारलेच. प्रशिक्षक शुकरी कॉनरॅड त्यावर म्हणाले, ‘आम्हाला त्यांना पुरते लोळवायचे होते!’ यजमानांनी पाहुण्यांच्या इच्छेचा मान राखलेला दिसतो. ‘अतिथी देवो भवः’ संस्कृतीला साजेसाच खेळ भारतीय क्रिकेटपटूंनी दोन्ही सामन्यांमध्ये केला. आपल्या फिरकी गोलंदाजांच्या तालावर परदेशी खेळाडू नाचत, हा इतिहास. आता स्वदेशातील खेळपट्ट्यांवर परदेशी फिरकी गोलंदाज भारतीय फलंदाजांना ‘ता-ता थैया, ता-ता थैया’ करायला लावतात. आधीच्या १२ कसोटी सामन्यांमध्ये एकदाच पाच बळी घेता आलेल्या सायमन हार्मर याला आपण १७ बळींची भेट दिली. हे ताजे वर्तमान पचायला आणि रुचायला कठीणच.

आपण नेहमी जिंकत(च) राहावे, अशी भारतीय चाहत्यांची अपेक्षा बनली आहे. एखादाही पराभव त्यांना सहन करता येत नाही, हे वेळोवेळी दिसतेच. खेळात हार-जीत चालायचीच, हे तत्त्वज्ञान केवळ कागदावरती आणि सांगण्यापुरते राहिले आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पराभव तेवढ्यामुळेच टोचतो, असे मुळीच नाही. अतिशय बेजाबदारपणे खेळून भारताने दोन्ही सामने गमावलेले आहेत. हंगामी कर्णधारपदाची जबाबदारी लाभलेला ऋषभ पंत या कसोटीतील दोन्ही डावांत कसा खेळला आणि कसा बाद झाला हे पाहिल्यावर ते लक्षात येते. संघातील अनुभवी फलंदाज के. एल. राहुल, ध्रुव जुरेल यांनी मैदानावर टिकून राहण्याची क्षमता दाखविली नाही. प्रत्येक सामन्यात ‘मन की खुशी, दिल का राजा’ पद्धतीने खेळलास तर तुझी जागा धोक्यात येईल, असे यशस्वी जयस्वाल याला कोणी सांगितले की नाही? सामना वाचविण्यासाठी खेळपट्टीवर उभे राहण्याची गरज असताना नितीशकुमार रेड्डी रीव्हर्स स्वीपचा गंमतीदार प्रयोग करत होता. प्रतिस्पर्धी संघाचे सामर्थ्य, आपल्या मर्यादा, संधी साधणे आणि धोके ओळखणे यात संघ पूर्णपणे अपयशी ठरला. धावफलक नेहमीच गाढव असतो का? तर मुळीच नाही. पूर्ण मालिकेत शंभराहून अधिक धावा करणारे दोनच भारतीय फलंदाज वॉशिंग्टन सुंदर (१२४) व रवींद्र जाडेजा (१०५). हे दोघेही पूर्ण वेळ फलंदाज नाहीत, हे लक्षात घेतले की, सलामीवीरांचे आणि मधल्या फळीचे अपयश ठसठशीत दिसते. मालिकेत सर्वाधिक चेंडू खेळला तो सुंदरच. चार वेळा सर्व गडी गमावणाऱ्या यजमान संघाकडून दोनच अर्धशतके - यशस्वी जयस्वाल व जाडेजा. आपल्या दोनच फलंदाजांची सरासरी पंचवीसहून अधिक. दक्षिण आफ्रिकेकडून एक शतक, तीन अर्धशतके झाली. या सर्व खेळात सामना जिंकून देणाऱ्या त्यांच्या सात फलंदाजांनी मालिकेत शंभराहून अधिक धावा केल्या आणि चौघांची सरासरी तीसहून अधिक. घरच्या मैदानावर, आपल्याला हव्या तशा खेळपट्ट्या बनविण्याचा आदेश दिल्यानंतरही मालिकेत पाहुण्यांच्या गोलंदाजांचा वरचष्मा दिसतो. दोन सामन्यांतील चार डावांमध्ये फक्त एकदाच यजमानांना दोनशेचा उंबरठा ओलांडता आला. एकदा तर शंभराच्या आत डाव आटोपला. खेळपट्टीत काही विशेष नाही, असे कुलदीप यादव सांगतो. आपले फलंदाज मात्र मार्को यान्सेन आणि हार्मर यांच्यापुढे शरणागती पत्करतात. हा फरक वृत्तीतला आहे. मालिकेत भारताने सात झेल सोडले. पाहुण्यांकडून दोन सुटले. त्याबद्दल पश्चात्ताप करण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्या मनमानी कारभारामुळेच भारतीय संघाची ही अवस्था झाली. कसोटी विश्वविजेत्यापदाच्या तालिकेत भारतीय संघाची आता पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे.

# अंबड नगर परिषद निवडणूक च्या रणधुमाळी प्रभाग १ मध्ये विकासाचा गंगाधर झंझावात



विरोधकांची गाळण उडाली गंगाधर भाऊ वराडे यांच्या विजयरथाला जनतेचा प्रतिसाद

अंबड /प्रतिनिधी :- अंबड नगरपरिषद निवडणूक २०२५ चा रणधुमाळी रंगतदार टप्प्यात प्रवेश झाला असून संपूर्ण शहराचं लक्ष वेधून घेणारा प्रभाग क्रमांक १ सध्या अक्षरशः गंगाधर झंझावाताने हादरून गेला आहे. महायुतीचे तरुण जोशपूर्ण जनमानसातील लोकप्रिय नेतृत्व गंगाधर भाऊ वराडे यांच्या धमाकेदार प्रचाराने विरोधकांची गाळण उडाली असून प्रभागात एकतर्फी लाट उसळल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

विकासाचा धडाका भाषणात नव्हे तर कृतीत

नगरसेवक म्हणून काम करताना गंगाधर भाऊ वराडे यांनी एक गोष्ट निर्विवाद सिद्ध केली विकासासाठी निधीची वाट बघत बसायचं नाही तर पुढे होऊन काम पूर्ण करायचं

वर्षानुवर्षे रखडलेले पाणीपुरवठा आणि रस्ते दुरुस्तीचे प्रश्न त्यांनी बेधडकपणे हाताळले.मुरूम टाकणे तातडीची दुरुस्ती

स्वखर्चातून करण्यात आलेली मूलभूत कामे या कामांमुळे प्रभागातील नागरिकांमध्ये त्यांच्याविषयीचा विश्वास अधिक घट्ट झाला आहे.त्यांच्या कर्तृत्वानेच विकास म्हणजे काय ? याचा खरा अर्थ प्रभाग १ च्या जनतेला अनुभवायला मिळाला.

लोकांमधील नातं २४ तास उपलब्ध हक्काचा माणूस विकास तर केला पण त्याचसोबत वराडेंनी माणूसकीचीही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.सरकारी योजनांचा लाभ गरजूंना घरपोच

वृद्ध, महिला आणि वंचित कुटुंबांपर्यंत मदतीचा हात राशन कार्ड मोहिमेतून अनेकांना दिलासा रात्री-अपरात्री एका फोनवर तत्काळ मदत जनतेच्या सुख-दुःखात धावून जाणारा हा नेता प्रभागातील प्रत्येक कुटुंबाचा हक्काचा माणूस म्हणून ओळखला जातो.

## अंबडच्या राजकारणात घड्याळ वेगाने धावणार प्रभाग क्र.४ मध्ये सलमान तांबोळींचा झंझावात

अंबड /प्रतिनिधी

अंबड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या रणशिंगाने शहराचे राजकीय तापमान चढले आहे.त्यातही सर्वाधिक चर्चा रंगली आहे ती प्रभाग क्रमांक ४ ची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ने या प्रभागातून ओबीसी आरक्षित जागेवर तरुण,तडफदार आणि सुशिक्षित चेहरा म्हणून सलमान अलिम तांबोळी यांना उमेदवारी देताच विरोधकांच्या गोटात खळबळ उडाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग ४ मधील नागरिक समस्या आणि अपुऱ्या विकासाच्या विळख्यात अडकले होते.पण आता परिस्थिती बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. नागरिकांच्या आशा-अपेक्षांचे केंद्रबिंदू ठरले आहेत सलमान तांबोळी सुशिक्षित संयमी पण आक्रमक बाणा असलेले नेतृत्व सलमान तांबोळी हे केवळ व्यापारी किंवा सामाजिक कार्यकर्ते नाहीत तर प्रशासनाच्या निष्क्रियतेवर धारेवर धरणारा बुलंद आवाज आहेत.सांडपाणी व्यवस्थापन,पिण्याच्या पाण्याचा प्रश्न किंवा रस्त्यांवरील अडचणी कोणत्याही विषयावर प्रशासनाशी दोन हात करण्याची तयारी त्यांनी वारंवार दाखवली आहे. लोकांच्या हक्कासाठी संघर्ष करणारा नेता म्हणजेच सलमान भाई असा सुर आता गल्लीबोळांत झंकारत आहे.त्यांची पारदर्शक प्रतिमा शब्दाला पक्केपणा आणि विकासाबद्दलचे स्पष्ट व्हिजन यामुळे प्रभाग ४ ला योग्य नेतृत्व मिळाल्याची भावना नागरिकांतून उमटत आहे.सलमान तांबोळी हे तरुणाईचे प्रतीक असून ओबीसी समाजाच्या भावना ओळखून त्या प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची ताकद त्यांच्यात आहे.आता बस झाली आश्वासनांची खैरात प्रभाग ४ च्या विकासाची नवी सुरुवात सलमान भाई करतील असे जणू शहरभर एकमत झालेले दिसते. अंबड नगरपरिषद निवडणुकीत या प्रभागातून विजयाचा गुलाल कोण उधळणार हे काही सांगण्याची गरज उरलेली नाही जनता आपला निर्णय मनाशी आधीच




तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.०३.११.२०२५

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख जमील अब्दुल्ला रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख जमील अब्दुल्ला | स्वतः | ११.०५.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.०३.११.२०२५

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख सलीम अब्दुल्ला रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख सलीम अब्दुल्ला | स्वतः | ०१.०९.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७२८ दि.-.-.२०२५

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख अब्दुल्ला शेख गफुर रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अब्दुल्ला शेख गफुर | स्वतः | ०७.०२.१९५६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.-.-.२०२५

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अफरोज अब्दुल्ला शेख रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अफरोज अब्दुल्ला शेख | स्वतः | १८.०६.१९८१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.०३.११.२०२५

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख फरीदा शेख अब्दुल्ला रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख फरीदा शेख अब्दुल्ला | स्वतः | ३०.११.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


पान १ वरून...

**अजितदादा, तुमच्या ....**

करण्याचा प्रयत्न केला.जोगदंड म्हणाले, लाचखोरीत पकडलेल्या व्यक्तीला स्वच्छ प्रतिमा म्हणणे ही जनतेची थेट फसवणूक आहे. गुन्हे सुरु असतानाही प्रेमलता पारवे यांनी, प्रेस घेवून निर्दोष असल्याचे वक्तव्य करणे अत्यंत हास्यास्पद आहे. कायद्याचा अवमान होऊ नये म्हणून योग्य कारवाई व्हावी. याशिवाय त्यांनी आरोप केला की, राष्ट्रवादी गटातील उमेदवारी प्रक्रियेत भूमाफिया, वाळूमाफिया आणि गुटखा माफिया यांचा प्रभाव वाढला आहे. प्रेमलता पारवे यांच्या माध्यमातून या सर्वांना मिळून वक्फ बोर्डाच्या जमिनी नावे करून घ्यायच्या होत्या. तसेच अन्य जमिनी देखील हडप करण्याचा डाव या लोकांचा होता. असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

**उमेदवार प्रेमलता पारवे ....**

कोणीही रोखू शकत नाही. आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक माजी आ. संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, शिवसंग्रामच्या डॉ.ज्योतीताई मेटे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, माजी नगरसेवक दिलीप गोरे, शेख निजाम, बळीराम गवते, फारुक पटेल यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम-सपा पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी श्रीमती प्रेमलता पारवे आणि सर्व ५२ उमेदवारांच्या प्रचारासाठी मुठ बांधली असून बीड शहरात त्यांच्या पॅनलचे पारडे जड झाले आहे. प्रत्येक प्रभागात राष्ट्रवादीच्या घड्याळाचा गजर होत असून गेल्या अनेक वर्षांपासूनचा विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी या निवडणुकीत परिवर्तन होणार असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

**गेवराईत पवारांनी काय...**

त्यांच्या संस्थेतील काही शिक्षक प्रभागात जाऊन पैसे वाटत आहेत. असे शिक्षक तरुण पिढीला काय शिकवणार? हेच त्यांच्या मूल्यांचे खरे दर्शन आहे. मला म्हणता तुमच्या भाषेचा स्तर घसरला आहे अरे तुमच्याबद्दल चांगलं बोलण्यासारखं आहेच काय? लक्ष्मण पवारांनी मंजूर केलेल्या कामांमधून कोट्यवधींची टक्केवारी वसूल करणारे हे लोक विकासाबद्दल बोलतात हीच मोठी शोकांतिका, असे पवारांनी कठोर शब्दांत म्हटले. आमदार झाले तर वर्षभरात आम्ही कोट्यवधी रुपये आणत असल्याची गर्जना करतात, पण हे विसरू नका लक्ष्मण पवार प्रत्येक वर्षी ४०० कोटी रुपयांचा निधी आणत होते हे तालुक्यातील सर्व जनतेला माहीत आहे.

गेवराईच्या राजकारणात संपूर्ण आयुष्य घालवूनही काहीच साध्य न झाल्याने पंडितांना जनता कधीच स्वीकारत नाही आणि पुढेही स्वीकारणार नाही.

एवढ्यावर न थांबता पवारांनी धक्कादायक आरोप करत सांगितले की, मार्केट कमिटीतून दरवर्षी ५ ते ७ कोटी रुपये तुम्ही खाता. माणूस किती निर्दयी असावा हे अमरसिंह पंडितांकडे पाहिल्यावर कळतं, असा टोला त्यांनी लगावला.

पान १ वरून...

आपल्या भूमिकेवर बोलताना पवार म्हणाले, माझं एकच स्वप्न फक्त माझं गाव सुखी असावं. मला पदांची इच्छा नव्हती, आजवर मी सहा नगराध्यक्ष, साठ नगरसेवक आणि एक आमदार घडवला आहे. शेवटी मतदारांना आवाहन करत पवार म्हणाले, जात-पातीला मत देऊ नका. संविधान, स्वाभिमान आणि गेवराईच्या सवरक्षणासाठी भाजपला मतदान करा. नगरपरिषद पंडितांच्या ताब्यात म्हणजे जनता त्यांच्या ताब्यात जाते, हे विसरू नका. म्हणून येत्या २ तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार व नगरसेवक पदाच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे शक्तीशाली आवाहन करत पवारांनी सभा दणाणून सोडली.

**स्वार्थासाठी रंग....**

विरोधकांनी आपल्या स्वार्थी धोरणामुळे शहराची अवस्था बकाल केली. महिलांसाठी सुरक्षितता नाही, सार्वजनिक स्वच्छतागृहे नाहीत, पिण्याच्या पाण्यासाठी पंधरा-पंधरा दिवस त्यांची हेळसांड होते. अनेक वर्षांपासून हा त्रास बीड शहरातील जनता सहन करत आहे. स्व.विनायक मेटे साहेबांनी बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला होता. परंतु विरोधकांनी कायम त्यांना विरोध केला. आता स्वार्थासाठी रंग बदलणाऱ्या क्षीरसागरांना त्यांची जागा दाखविण्याची नामी संधी आपल्या मिळाली आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**घड्याळ, तुतारीचा कार्यक्रम....**

नेतृत्व लाभले आहे. मुंडे-क्षीरसागर यांची जुनी राजकीय युती असून जयदत्त क्षीरसागर आमदार असताना देवेंद्र फडणवीस व स्वतः पंकजाताई मुंडे यांनी बीडच्या विकासासाठी २०० कोटी रुपयांचा निधी दिला. नगरोत्थान योजनेतून बीड शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची कामे झाली. डॉ.योगेश यांच्या नेतृत्वाखाली बीडच्या सर्वांगीण विकासासाठी आपण ठामपणे पाठीशी उभी राहणार आहे. सत्ता आल्यानंतर प्रत्येक तीन महिन्यांनी आढावा बैठक घेऊन नगरपरिषदेतील विकासकामांना निधी मिळवून दिला जाईल. विजयी उमेदवारांना इंदोर व भोपाळ येथे पाठवून विशेष प्रशिक्षण देण्यात येईल आणि इंदोर-भोपाळ पॅटर्न बीडमध्ये राबवून शहराचा सर्वांगीण कायापालट केला जाईल. स्वच्छ, सुंदर व सुरक्षित बीड निर्माण करणे हेच भाजप व डॉ.योगेश क्षीरसागर यांचे मिशन असून युवकांच्या हाताला काम देत रोजगार निर्मितीला चालना दिली जाईल. महिलांना बचतगटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाईल व सुशिक्षित, सुरक्षित आणि समृद्ध बीड घडविण्याचा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. विकासाची ‘ज्योत’ पेटवण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी मी ठामपणे उभी आहे. डॉ.क्षीरसागर दाम्पत्य भाजपाला मिळालेली शक्ती आहे. नवीन सुशिक्षित युवा पिढी बीडचा सर्वांगीण विकास करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपने

पान १ वरून...

दिलेला सुशिक्षित, सुसंकृत चेहरा डॉ.ज्योती घुंबरे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना ‘कमळ’ चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करा, असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. सभेत अनेकांनी मनोगत व्यक्त करून भाजपच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बीडच्या सर्वांगीण विकासासाठी ...**

प्रश्न अशा अनेक मुलभूत प्रश्नांची सोडवणुक येणाऱ्या काळात केली जाईल असे सांगून विरोधकांच्या भुलथापांना दबावाला बळी पडू नका, निर्भयपणे मतदान करा. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बालेपीर भागातील सफाई कामगार संघटनेचे नेते शेख शब्बीरभाई यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून सर्व उमेदवारांना पाठिंबा दिला. याप्रसंगी डॉ.ज्योती मेटे, कल्याण आखाडे, दिलीप गोरे, भागवत तावरे यांनीही मनोगत व्यक्त करून सर्व उमेदवारांना नगर परिषदेत काम करण्याची संधी देण्याचे आवाहन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालेपीर येथे आयोजित कॉर्नर बैठकीत अक्षरशः सभेचे स्वरुप प्राप्त झाले. आ. विजयसिंह पंडित यांच्यासह शिवसंग्रामच्या डॉ.ज्योती मोटे, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, माजी नगरसेवक दिलीप गोरे, शिवसेनेचे अनिल जगताप यांनी बीड शहरातील विविध प्रभागात झंझावाती दौरा करून शहर पिंजून काढले आहे. ठिकठिकाणी त्यांना उत्फुर्त प्रतिसाद मिळत असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्रपक्षाचे सर्व उमेदवारांचे पारडे जड झाले आहे.

**भाजप-रासप युतीच्या.....**

नवी दिशा देईल असा विश्वास व्यक्त केला.

जनसमुदायाचा प्रचंड प्रतिसाद

महावीर चौकात मतदारांनी हजारोंच्या संख्येने गर्दी केली होती.व्यासपीठावर उपस्थित असलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये राहुलजी लोणीकर,दीपकभैया ठाकूर, बद्रीनाथ पठाडे,अनिलराव कोलते पाटील,देविदास कुचे, शेख फेरोज (अध्यक्ष),रमेश वाघ महाराज, तारेख चाऊस, खुर्शीद जिलाणी(चिचा),भगवान मात्रे, सचिन खरात (रासप)भीमराव जावळे,पद्माकर जऱ्हाड,शेख शकील,औदुंबर बागडे,डॉ.राजेंद्र ठोसर, बाळासाहेब तायडे,बाबुराव मामा खरात,शंकर लाहमागे,केदार कुलकर्णी,द्वारकदास जाधव, बाळू काळे यांचा समावेश होता.

या सर्व पदाधिकाऱ्यांनी युतीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी मतदारांना भावनिक साद घातली.प्रत्येक वक्त्याने नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. देवयानी केदार कुलकर्णी यांच्या नेतृत्वाची प्रशंसा केली आणि त्यांच्या दूरदृष्टीमुळे अंबड शहराचे रूप बदलेल,असा विश्वास व्यक्त केला.

# बीड नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार सौ करुणा मस्केंना मतदारांची पसंती ?

## माजीमंत्री अशोक पाटील यांनी सामान्य कार्यकर्त्यांना न्याय दिल्याची भावना !

बीड प्रतिनिधी

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने बीड नगरपालिकेमध्ये नगराध्यक्षांसह ३० जागेवर पंजा या चिन्हावर अधिकृत उमेदवार उभे केले आहेत. उर्वरित २२ जागेवर मित्र पक्षाचे उमेदवार उभे करून संपूर्ण ५२ प्रभागांमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्यासाठी सामान्य कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. यामुळे मतदारांमधून नगराध्यक्षांसह सर्व उमेदवारांना सहानुभूती मिळत आहे.माजी मंत्री अशोक पाटील यांनी सामान्य उमेदवारांना संधी देऊन न्याय दिल्याची भावना आता मतदारांमधूनच व्यक्त होत आहे.



बीड नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेस आय पक्षाकडून पंजा या चिन्हावर सौ करुणा मिलिंद मस्के निवडणूक लढवत आहेत.त्यांचा थेट जनतेच्या घरापर्यंत जाऊन संवाद साधण्यावर भर असल्यामुळे उमेदवार आपल्याला प्रत्यक्ष भेटून मत मागत आहे, आपल्या अडचणीत जाणून घेत आहे. यामुळे मतदारांमधून नगराध्यक्षांच्या प्रती सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. ही सहानुभूती मतांमध्ये परिवर्तित होणार असून काँग्रेस पक्षाला बीडमध्ये पुन्हा एकदा नवचैतन्य मिळेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्व उमेदवारांसह नगराध्यक्षांच्या प्रचारासाठी काँग्रेसची सर्व टीम, प्रमुख पदाधिकारी,स्वतः उमेदवार आणि त्यांचे संपूर्ण मस्के कुटुंब बीड नगरपालिके अंतर्गत येणाऱ्या सर्व वार्डामध्ये मतदारांच्या थेट गाठीभेटी घेऊन आपले अमूल्य मत काँग्रेसच्या पंजाला द्यावे असे आवाहन करत आहेत. यामुळे निश्चितच बीड नगरपालिकेमध्ये माजी मंत्री अशोक पाटील, विद्यमान खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून विकासाची नवी दिशा निर्माण केली जाईल असा विश्वास व्यक्त होत आहे. या विश्वासाला सामान्य जनतेने स्वीकारल्यामुळे बीडमध्ये परिवर्तन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# लोकसभेत तोंड न पाहणारे क्षीरसागर–मुंडे कमळाच्या फुलात कसे ?

## शिव–मिमचे मावळे भिमाच्या लेकीसाठी एकवटले

बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमध्ये नैसर्गिक-अनैसर्गिक युतींचे पेव फुटले असून केवळ आपल्याच घरात सत्ता असावी यासाठी अवघे प्रस्थापित क्षीरसागरांच्या बंगल्यात एकवटले आहेत. दुसरीकडे मात्र प्रेमलता पारवे यांच्यासाठी स्वराज्याचा पाईक असलेल्या हिंदु-मुस्लिम-मावळ ठाम निर्धाराने एकटवटला असून विकासाच्या भुमिकेवर अजितदादांच्या घडीसाठी उत्सुक दिसून येत आहे.

गेली तीस वर्षे नगर परिषदेची सत्ता एकाच कुटूंबाकडे राखीव होती मात्र नगराध्यक्ष पद राखीव झाल्याने शहरात नवे समीकरणे उदयास आली. लोकसभेत पंकजा मुंडेंचा पराभव ज्या जयदत्त क्षीरसागर यांनी आखून-रेखून केला त्या क्षीरसागरांच्या मदतीला पंकजा मुंडे धावून आल्या आहेत. बारामतीचा सांगावा आल्याने दारातली हळद सोडून बीडच्या मोहिमेवर पंडितांची वर्दी लागली. बहुजनी बुध्दिजिवीमध्ये गेवराईच्या पंडितांचा शब्द प्रमाण मानला जात असल्याने आणि राष्ट्रवादीच्या उमेदवार मुजीबभाईच्या सासू असल्याने राष्ट्रवादीची घडी विजयसिंहांनी बसवली. प्रचारात प्रचंड-उदंड प्रतिसाद सामान्य मतदारांत मुजीब यांची असलेली क्रेझ, अजित पवारांची शिस्तप्रिय विकासनिती लक्षात घेता घडीने प्रचारात थेट आघाडी घेतली आहे. पंकजा मुंडे यांच्या जिव्हारी लागलेल्या पराभवात क्षीरसागरांनी हातभार लावला हे मुंडेंच्या वोट



बँकेला रुचेल असे वाटत नाही. केवळ क्षीरसागरांचा बालहट्ट पुरवण्यासाठी मुंडेंचा पारंपारिक मावळ आणि थोरल्या क्षीरसागरांची प्रतिष्ठा पणाला लागल्याचे तितके कारण वाटत नाही. अशा स्थितीत अजित पवारांनी मुजीब यांचा चेहरा पाहून एका दलितमित्राच्या कन्येला दिलेली उमेदवारी अधिक आश्वासक ठरते.

# अंबड प्रभाग क्र. ६ मध्ये महायुतीचा झंझावात; सचिन भाऊ खरात व खुर्शीद जिलाणींच्या वाघांचा गजर विरोधकांच्या छातीत धडकी

अंबड /प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेच्या निवडणुकीचा तापमान शिगेला पोहोचल्याने प्रभाग क्रमांक ६ मध्ये वातावरण पूर्णपणे विद्युतीत झाले आहे.महायुतीच्या आणि राष्ट्रीय समाज पक्षाच्या तडफदार जोडीने सचिन भाऊ खरात आणि खुर्शीद जिलाणी आपल्या दमदार नेतृत्वाने विरोधकांची झोप उडवली आहे.



वाघांची डरकाळी या एका घोषणेमुळेच जनसागर उठतोय रस्त्यावर उसळणाऱ्या गर्दीत जयघोषांचे लाटे उमटत आहेत, आणि विरोधकांचे गणित पूर्णपणे ढवळून निघाले आहे.हक्कासाठी लढणारा मनमिळावू नेताप्रभागातील सर्वसामान्य जनतेशी मनापासून जोडलेला जात-पातीच्या भिंती पुसणारा आणि वर्षानुवर्षे नि:स्वार्थ समाजकार्य करणारा नेता म्हणजेच सचिन भाऊ खरात. युवकांचा लाडका भाऊ आणि ज्येष्ठांचा आधारवड म्हणून ओळख असलेले सचिनभाऊ आणि खुर्शीद जिलाणी या जोडीने विकासाचे नवीन पर्व सुरू करण्याचा ध्यास घेतला आहे.विरोधकांची अवस्था हवालदिल सचिनभाऊंच्या प्रचारसभांना उमटणारी गर्दी जयजयकाराचे नारे आणि मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहून विरोधक अक्षरशः गारठले आहेत.आता लढायचे कोणाशी ?असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.प्रभागातला हा उत्स्फूर्त जनसमर्थन पाहता निवडणुकीचा निकाल आता फक्त एक औपचारिकता राहिल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.विकासाचा स्पष्ट मार्ग माझा संघर्ष सत्तेसाठी नाही तर प्रत्येक सामान्य माणसाच्या हक्कासाठी आहे.तुमची साथ आणि माझा विकास हाच माझा संकल्प असा दमदार संदेश सचिनभाऊंनी जनतेसमोर दिला आहे.मूलभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणी आणि आरोग्य या प्रश्नांवर ठोस काम करून प्रभागाचा कायापालट करण्याच्या त्यांच्या वचनावर मतदारांचा पूर्ण विश्वास आहे.एकच नारा विकासाचा आणि सचिनभाऊंचा!प्रभाग क्रमांक ६ मध्ये आज एकच हवा आहे विकास हवा तर सचिनभाऊ हवा शहरातील प्रत्येक गल्लीत प्रत्येक कोपऱ्यातून हा नारा गाजत आहे. अंबडच्या स्वाभिमानी नागरिकांनी महायुतीचे लढवय्ये सचिन भाऊ खरात आणि खुर्शीद जिलाणी यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचा निर्धार केला

# डॉ. गौरी पालवे-गर्जे आत्महत्या प्रकरणी, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कुटुंबीयांची घेतली भेट; आरोपींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश

'न्याय मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही' – डॉ. गोऱ्हे; सक्षम सरकारी वकील उपलब्ध करून देण्याचे आश्वासन

बीड : बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथे आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्व. डॉ. गौरी पालवे-गर्जे यांच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांच्या मनातील प्रश्न, वेदना आणि न्यायाबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, गौरी पालवे-गर्जे यांचा मुंबईतील मृत्यू अत्यंत दुर्दैवी आहे. तिच्या कुटुंबाने काही महत्त्वाची अतिरिक्त माहिती पोलिसांना द्यायची इच्छा व्यक्त केली; परंतु त्यांची नोंद झाली नव्हती. या तक्रारीची मी तत्काळ दखल घेऊन मुंबई पोलिसांशी तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी बोलले असून, पुढील दोन-तीन दिवसांत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या सर्व पुरवणी जबाबांची नोंद केली जाणार आहे.

कुटुंबीयांनी आरोपीचे भाऊ अजय गर्जे आणि बहीण शीतल आंधळे यांनाही अटक करावी, अशी मागणी केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गौरीवर पूर्वी अनेकदा मारहाण झाल्याचे त्यांनी सांगितल्याने या प्रकरणाचे मूळ कारण नीट समजून घेणे अत्यावश्यक असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

उपसभापती म्हणून जबाबदारी आहेच, पण आई म्हणूनही हे प्रकरण मन हेलावून टाकणारं आहे. कुटुंबीयांना सक्षम सरकारी वकील मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी मी स्वतः बोलणार आहे. तपासात कुठलाही दबाव सहन केला जाणार नाही, असे त्यांनी



सांगितले.

न्यायप्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई पोलिसांना दोन महत्त्वाचे निर्देश दिले–

पहिला, तपासाच्या प्रगतीबाबत अधिकृत बुलेटीन दर दोन दिवसांनी पत्रकारांना देण्यात यावे, जेणेकरून अफवा आणि अप्रमाणित माहितीला आळा बसेल.

दुसरा, अशा संवेदनशील खटल्यांमध्ये न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडितेवरच आरोप केले जातात; म्हणून संपूर्ण सुनावणीचे इन कॅमेरा व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी न्यायालयात विनंती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

# पोकळ आश्वासनं नको; लिखित वचन देणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्या

## एस.एम.युसूफ यांचे मतदारांना आवाहन

प्रतिनिधी @ बीड

बीड नगर परिषद साठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. या निवडणुकीत बीड शहरातील तीन कामे करण्याचे आश्वासन नाही तर लिखित वचन देणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्या नसता पुन्हा या तिन्ही प्रश्नांसाठी पुढच्या निवडणुकीपर्यंत नुसती वाट पहात बसावे लागेल याचे भान असू द्या असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.




याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील खासबाग-मोमीनपुरा हे दोन मोठे भाग जोडण्याकरिता बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचे निर्माण, शहराची ओळख असलेले ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण आणि मोमीनपुरा भागातील ऐतिहासिक महेदवीया दायरा च्या संरक्षक भिंती बांधणे.

या तिन्ही प्रश्नी गेल्या काही वर्षांपासून शासन-प्रशासनासह बीड जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून सुद्धा यापैकी एकही प्रश्न राजकारणी शासन असो की प्रशासन की पालकमंत्री कोणीही अद्याप पर्यंत सोडविले नाही. प्रशासनिक अधिकारी मग ते जिल्हाधिकारी असो, मुख्याधिकारी असो की तहसीलदार असो अशा प्रश्नांकडे ढुंकून सुद्धा पाहायला तयार नाहीत.

दुसरीकडे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्याने राजकारणी आमदार यांनी बीड शहरवासियांसाठी हे प्रश्न सोडविणे आवश्यक असून सुद्धा गेल्या सात वर्षात या प्रश्नांविषयी प्रसिद्धी माध्यमातून फक्त गवगवा केला. यात पुलाच्या निर्माणासाठी काही वेळा बिंदुसरा नदीत चक्कर मारून पुलनिर्माणाचा आव आणला व आणत आहेत.

आमदारांनी महेदवीया दायरा कब्रस्तान चा पाहणी दौरा करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधून देण्याचे आश्वासन सोबत असलेल्या माजी आमदारासह अनेकांच्या उपस्थितीत दिले होते. त्याला आता तीन वर्षे झाली आहेत. तरीही या कब्रस्तानच्या संरक्षक भिंती अजून बांधून दिल्या नाहीत.

बीडचे आमदार असूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या प्रश्नांकडे आजपर्यंत ढुंकून सुद्धा पाहिले नाही. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी याच कारंजा टॉवरच्या बाजूला असलेल्या चहाच्या हातगाड्यावर जाऊन त्यांनी माजी आमदार व कार्यकर्त्यांसह चहाचा आस्वाद घेतला. या सर्व बाबी पाहता हे तिन्ही प्रश्न असणाऱ्या प्रभागातील मतदारांनी या तिन्ही प्रश्नांसाठी शासन-प्रशासनासमोर उभे राहून लढा देण्याची धमक असलेल्या उमेदवारांनाच या प्रभागातून नगरसेवक पदी निवडून द्यावे.

तसेच हे तिन्ही प्रश्न सोडविण्याचे पोकळ आश्वासन नव्हे तर ही तिन्ही कामे प्राधान्याने करण्याचे लिखित वचन देणाऱ्या उमेदवारालाच नगराध्यक्ष पदी निवडून द्या नसता पुन्हा या तिन्ही प्रश्नांसाठी पुढच्या निवडणुकीपर्यंत नुसती वाट पहात बसावे लागेल याचे भान असू द्या. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.




# नवगण महाविद्यालयात संविधान दिन साजरा

प्रतिनिधी / परळी (वैजनाथ)

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित नवगण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन संपन्न झाले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे, प्रमुख अतिथी प्राचार्य चंद्रसेन आवारे, प्रा. आर. एल. जोशी, प्रमुख वक्ते वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अनुरथ चंद्रे उपस्थित होते.

कार्यक्रमात सर्वप्रथम संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. अनुरथ चंद्रे यांनी भारतीय राज्यघटनेत नागरिकांसाठी विशेष महत्वपूर्ण असलेल्या विविध कायदेविषयक तरतुदींचे सविस्तर विश्लेषण केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य हांगे यांनी भारतीय नागरिकांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवन हे संविधानाच्या अनुषंगानेच चालत असल्याचे नमूद करत लोकशाहीत संविधानाची महत्वपूर्ण भूमिका यावर भाष्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजा आचार्य यांनी केले. आभार प्रा. दयानंद कुरुडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. मिलिंद कळंबे, प्रा. परशुराम राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# चौसाळा येथिल गुरुदत्त माध्यमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा.

प्रतिनिधी @ चौसाळा

बीड तालुक्यातील चौसाळा येथील गुरुदत्त माध्यमिक विधालयात संविधान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला सर्वप्रथम भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वभुषण महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजन शाळेचे मुख्याध्यापक श्री चौधरी सर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रास्ताविक श्री जयवंत मोठे सर यांनी केले संविधान दिनानिमित्त आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला यातील विजेत्या विद्यार्थ्यांना गुरु महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब यांच्या वतीने बक्षीस वितरण करण्यात आले सूत्रसंचालन श्री घोडके सर यांनी केले तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी



विश्वभुषण महामानव भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी विचार व्यक्त केले शाळेतील शिक्षिका सौ. श्रीमती साबणे मॅडम यांनी संविधान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले स्वतंत्र समानता बंधुता न्याय हे संविधानाचे अधिकार भारतीय संविधानांनी आपल्या भारतीय नागरिकांना दिली आहे तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर यांनी संविधान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले . शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय चौधरी सरांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात संविधानामधील मूलभूत अधिकार व देशाप्रती नागरिकांचे कर्तव्य यावरती प्रकाश टाकला. संविधान लिहिण्यासाठी दोन वर्ष ११ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला होता भारतीय संविधानात एकूण ४४८ कलमे १२ अनुसूची आणि ११८ विभाग आहेत

# बीड जिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन ५ दिवसांपासून बंद गोरगरिबांचा जीव टांगणीला

## 'मशीन सुरू न झाल्यास पालकमंत्र्यांना शाही फेक, सीएस केबिनला टाळे'

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन गेल्या ४-५ दिवसांपासून कंपनीच्या थकबाकीमुळे बंद आहे. यामुळे गंभीर आजारी रुग्णांना खाजगी सेंटरमध्ये ४-५ हजार रुपये मोजून स्कॅन करावे लागत असून गरीब रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. याप्रकरणी ऑल इंडिया पँथर सेनेने सिव्हिल हॉस्पिटलला भेट देऊन तीव्र नाराजी व्यक्त केली आणि पालकमंत्री अजित पवार व राज्याच्या



आरोग्यमंत्र्यांना थेट इशारा दिला.ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज दुपारी जिल्हा रुग्णालयाला भेट दिली. सिटीस्कॅन केंद्रातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की, कंपनीचे बिल थकीत आहे, त्यामुळे मशीन बंद करण्यात आली आहे. यावर संतापलेल्या नितीन सोनवणे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सी. एस. राऊत यांच्याशी फोनवर थेट चर्चा केली. तसेच पालकमंत्री अजित पवार व महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री यांना बजावले आहे की, तात्काळ २४ तासांच्या आत सिटीस्कॅन मशीन सुरू करा, अन्यथा लोकशाही मार्गाने पालकमंत्री व आरोग्यमंत्र्यांना घेराव घालून शाही फेक आंदोलन करण्यात येईल. गरज पडल्यास जिल्हा शल्यचिकित्सकांच्या केबिनला टाळे ठोकले जाईल.ते पुढे म्हणाले, हे सरकारी रुग्णालय आहे की खासगी दुकान? पालकमंत्री अजित दादा पवार बीडमध्ये प्रचारसभा घेऊन मत मागतात, पण सर्वसामान्य माणूस तडफडून मेला तरी त्यांना काही देणेघेणे नाही, असे चित्र दिसते. गरीब रुग्णांना खाजगी सेंटरमध्ये लुटले जाणार का?

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# घड्याळ, तुतारीचा कार्यक्रम करुन मतदारांनो कमळ फुलवा - मंत्री पंकजा मुंडे

## धोंडीपुरातील जगदीश गुरखुदे यांचा वार्ड क्रमांक ७ ताईंच्या रेकॉर्ड ब्रेक सभेने झाला भाजपमय

बीड /प्रतिनिधी

बीड शहरात भाजपमय वातावरण दिसत आहे. यावेळी बीड नगरपरिषदेवर भाजपाचा झेंडा निश्चित फडकणार आहे. घड्याळ, तुतारीचा कार्यक्रम करून टाका आणि कमळ फुलवा, अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आवाहन केले. धोंडीपुरा येथे जगदीश गुरखुदे यांच्या प्रचारार्थ वार्ड क्रमांक सात मध्ये आयोजित सभेला मतदारांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता गुरखुदे यांच्या विजयावर शिक्का मोर्तब तर झालेच मात्र संपूर्ण वार्डच भाजपमय झाल्याचे दिसून आले.

बीड शहरातील धोंडीपुरा भागात भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा बुधवारी (दि.२७) सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घोमरे (घुंबरे) यांच्या व नगरसेवक पदाचे प्रभाग क्र.०६ चे श्वेता जितेंद्र जाधव, सुबोध थिगळे, प्रभाग क्र.०७ चे जगदीश गुरखुदे, भाग्यश्री सागर देशपांडे, प्रभाग क्र.८ चे संध्या राजपूत, राहुल गुरखुदे, प्रभाग क्र.१७ चे विशाल राऊत व सौ.अनिता बाबासाहेब वडमारे यांना कमळ चिन्ह समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन पंकजाताईंनी केले. या सभेस भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, ड.सर्जेराव तांदळे, आदित्य सारडा, विजयकुमार पालसींगनकर, बाळासाहेब अंबेकर, परशुराम गुरखुदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित, सक्षम व दूरदृष्टी नेतृत्वाखाली





बीड नगरपरिषदेवर निश्चितपणे भाजपाचे कमळ फुलणार आहे. 'महिला तिथे, विजय तिथे' हे समीकरण असून 'कमळ म्हणजे विश्वास' आहे. स्व.गोपीनाथ मुंडे, जयदत्त क्षीरसागर व स्व.केशरकाकू यांच्या विचारांनी प्रेरित डॉ.योगेश, डॉ.सारिका यांच्या रूपाने बीड जिल्ह्याला पुढारलेल्या विचारांचे

(उर्वरीत पान २ वर)

### जगदीश गुरखुदे आमचा लाडका कार्यकर्ता : पंकजाताई मुंडे

बीडमध्ये धोंडीपुऱ्यातील सभा आणि मुंडे कुटुंब यांचे नेहमीच एक भावनिक नाते राहिलेले आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे देखील येथे प्रचाराची विजयी सभा घ्यायचे. या भागातील जनता कायम भाजपसोबत राहिलेली आहे. येथील जगदीश गुरखुदे हा दिवंगत गोपीनाथ मुंडेंचा लाडका कार्यकर्ता राहिला, तो माझाही लाडका आहे. लाडका जगदीश म्हणूनच आम्ही त्यांच्याकडे पाहतो असा आवर्जून उल्लेख मंत्री पंकजाताई मुंडे यांनी धोंडीपुरा येथील सभेत केला.

### ३५ वर्षातील पस्तीसशे कामे सांगतो : डॉ. योगेश क्षीरसागर

या बीड शहरातील जनतेने उगीच ३५ वर्ष आमच्यावर विश्वास टाकला नाही, आम्ही कामे केल्याने आम्हाला पुन्हा पुन्हा निवडून दिले. आज जे विचारताहेत की ३५ वर्षात काय केले, त्यांना मी पस्तीसशे कामे सांगू शकतो. आम्ही विकास करणारी माणसे आहोत, आता आपल्या पाठीशी भाजपची, पंकजाताई मुंडेंची बलाढ्य शक्ती उभी आहे असे डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले.

# गेवराईत आज होणाऱ्या पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा - बाळराजे दादा पवार

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई नगरपरिषद निवडणुकीचा धुरळा उडत असताना भारतीय जनता पार्टीने आज आयोजित केलेल्या जाहीर सभेची संपूर्ण शहरात चर्चा रंगली आहे. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार आणि सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस तसेच राज्याच्या मंत्री मा.पंकजाताई मुंडे या आज गेवराईत भव्य जाहीर सभेला उपस्थित राहणार आहेत.

आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता भगवती टॉकीजसमोरील विशाल प्रांगणात होणार असून या सभेला गेवराईकरांनी विक्रमी संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजप नेते मा.बाळराजे दादा पवार यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांत भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराला शहरात प्रचंड



प्रतिसाद मिळत असून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गीताभाभी पवार यांच्यासह २२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांना मतदारांचा मोठा जनाधार मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

या सभेला पंकजाताई मुंडे यांच्यासह जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजी मंत्री बदामरावजी पंडित यांच्यासह आदींची उपस्थिती राहणार आहे. या सभेतून पंकजाताई शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, महिला - सशक्तीकरण, युवा संधी, व्यापारी सुविधा अशा विविध विकास प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करतील. व गेवराईच्या विकासाचा नवा अध्याय भाजपच्या हातूनच सुरू होईल.



आजची पंकजाताईंची सभा ही विकासाची मोहर ठरणार असून या सभेला महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांनी तसेच सर्व समाजघटकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून शक्तीप्रदर्शन करावे असे आवाहन भाजप नेते बाळराजे दादा पवार यांनी केले आहे.

# बीडच्या सर्वांगीण विकासासाठी विरोधकांची मक्तेदारी मोडून विकासाचा गजर करु - आ. विजयसिंह पंडित

## विविध प्रभागात आ. विजयसिंह पंडित, डॉ.ज्योती मेटे, कल्याण आखाडे, दिलीप गोरे यांचा झंझावात

बीड /प्रतिनिधी

बीड नगर परिषदेवर ३५ वर्षे राज्य कारभार केला, परंतु शहरातील नागरीकांचे मुलभूत प्रश्न त्यांना सोडवता आले नाही. इथला पाणी प्रश्न गंभीर आहे, रस्ते, नाल्या नाही, अनेक प्रश्न भिजत पडलेले आहेत. विरोधकांनी हुकूमशाही पध्दतीने सत्ता केली. मुस्लिम समाजाने ३५ वर्षे त्यांना साथ दिली पण ऐन मोक्याला आज ते तुम्हाला वाऱ्यावर सोडून गेले आहेत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा धर्मनिरपेक्ष विधारधारेवर चालणारा पक्ष आहे. पक्षाचे नेते आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आपल्यालाल शब्द दिला आहे, तो शब्द पूर्ण करण्यासाठी आपण सहकार्य करा आपल्या सर्वांच्या साथीने आणि सहकार्याने विरोधकांची मक्तेदारी मोडून टाकू आणि बीड शहरात ना. अजितदादा यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचा उदय करू असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. बीड




शहरातील विविध प्रभागातील कॉर्नर सभेत मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शिवसेना - शिवसंग्राम - स.पा. आदी मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. २ मधील उमेदवार सौ. दिपालीताई किशोर धोत्रे, राहुल मधुकर शिनगारे तसेच प्रभाग क्र.१५ मधील डॉ.सुनिता प्रकाश काळे, पांडव अजिंक्य राजेंद्र, प्रभाग क्र. १ मधील धनंजय बाळासाहेब काळे आणि प्रभाग क्र.११ मधील शेख फरहत बेगम नसीर आणि शेख मोहम्मद खालेद यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्यवा कॉर्नर सभा झाल्या. या कॉर्नर सभेला मतदारांनी उस्त्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय नेत्या श्रीमती ज्योती मेटे, माजीनगरसेवक दिलीप गोरे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, बळीराम गवते, रात्नाकर काळे, अनिल घुमरे, निखील सवई, सुहास पाटील, भास्कर जाधव, शेख मुजीबभाई, भागवत तावरे, काझी रऊफ, काझी युसूफ, काझी नवाब यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्यासारखे सक्षम नेतृत्व आपल्याला लाभले आहे. त्यांनी विकासाचे व्हिजन आपल्या समोर ठेवलेले आहे. त्यांचे हात बळकट करून बीड शहराचा कायापालट करण्यासाठी घड्याळाचा गजर करा. बीड शहरातील रस्ते, नाल्या, कचऱ्याचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा

(उर्वरीत पान २ वर)

# भाजप-रासप युतीच्या प्रचारार्थ मा.आ.रवींद्रजी चव्हाण याची अंबडमध्ये विजयी तोफ

अंबड /प्रतिनिधी :- अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या रणधुमाळीत भारतीय जनता पार्टी भाजप आणि राष्ट्रीय समाज पक्ष रासप युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. देवयानी केदार कुलकर्णी यांच्यासह २२ नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी मंत्री तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष मा.आमदार श्री.रवींद्रजी चव्हाण यांची महाविजय संकल्प जाहीर सभा महावीर चौक अंबड येथे मोठ्या उत्साहात व अभूतपूर्व जनसमुदायाच्या साक्षीने संपन्न झाली.या सभेने अंबडच्या राजकीय वातावरणात मोठी ऊर्जा



भरली असून युतीचे सरकार अंबडचा विकास हा संदेश प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवला गेला.

प्रमुख उपस्थिती आणि विकासाचा रोडमॅप

मा.प्रदेशाध्यक्ष श्री.रवींद्रजी चव्हाण यांनी आपल्या खास शैलीत भाषण करताना केंद्र आणि राज्यातील डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून अंबड शहराला विकासाच्या महामार्गावर आणण्याचे आश्वासन दिले.त्यांनी युतीचे उमेदवार हे केवळ निवडणुकीपुरते नाहीत तर अंबडला आदर्श शहर बनवण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले आहेत असे ठामपणे सांगितले.

### निवडणुकीचे चित्र स्पष्ट

या जाहीर सभेमुळे भारतीय जनता पार्टी आणि रासप युतीचे पारडे जड झाले असून ही सभा आगामी निवडणुकीत निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. उमेदवारांनी मतदारांच्या प्रश्नांना थेट उत्तरे देत पारदर्शक आणि गतिमान प्रशासनाचे आश्वासन दिले.अंबडच्या नागरिकांनी विकासाला साथ देण्याचा निर्धार केल्याचे चित्र या सभेच्या प्रचंड गर्दीतून स्पष्ट झाले.

यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री मा.श्री.डॉ. भागवतजी कराड,मा.आमदार श्री.विक्रांत पाटील,माजी आ. श्री.विलास बापू खरात यांच्यासह भाजप-रासप युतीचे दिग्गज नेते उपस्थित होते.

मा.डॉ.भागवतजी कराड यांनी आपल्या मार्गदर्शनात अंबडचा विकास आता केवळ आश्वासन नाही तर काळाची गरज आहे. देवयानी कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील टीम शहराला एक

(उर्वरीत पान २ वर)

# अलहुदा उर्दू हायस्कूलमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

बीड प्रतिनिधी

नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे संविधान दिन मोठ्या उत्साहाने आणि शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. देशाच्या लोकशाही सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या भारतीय संविधानाची महती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. तसेच विविध घटकांवर आधारित आकर्षक पोस्टर प्रदर्शनही विद्यार्थ्यांनी सादर केले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख अब्दुल हमीद यांनी उत्कृष्टरीत्या केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डॉ. पठाण सिराज खान यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, त्यातील वैशिष्ट्ये तसेच सामान्य नागरिकांना मिळणारे मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि न्यायसंस्थेची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. संविधान हे केवळ पुस्तक नसून देशाच्या स्वाभिमानाची आणि एकतेची शपथ आहे असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाला सहशिक्षक शेख मोईजुद्दीन, मोहम्मद रफीक, सय्यद रहबर यांसह सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व अध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय बीड व युवा ग्राम विकास मंडळ केज यांचा संयुक्त उपक्रम




## जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेतली बाल विवाह प्रतिबंध शपथ

बीड (प्रतिनिधी)

युवा ग्राम विकास मंडळ आणि महिला व बाल विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आज दिनांक २७ नोव्हेंबर २०२५* रोजी 'बाल विवाह प्रतिबंध शपथ' कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बाल विवाहातून वाचलेल्या मुलींसाठी सुरू होत असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली.'बाल विवाह मुक्त भारत' अभियानाला एक वर्ष पूर्ण होत असताना तसेच राज्यस्तरावर १५ ऑक्टोबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या बाल विवाह मुक्त महाराष्ट्र - आपला संकल्प या १०० दिवसीय अभियानाचा भाग म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे, सदस्य संतोष वारे, एस. पी. राजहंस व छाया गडगे, श्रपोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, ओमप्रकाश गिरी, तत्वाशील कांबळे, शक्तीसदनचे उमेश होमकर, आशा धनवडे, उषा जाधव, सखी वन स्टॉप सेंटरच्या शांता खांडेकर, चाईल्ड हेल्पलाईनचे प्रविण वीर व स्वप्नील कोकाटे तसेच युवा ग्राम विकास मंडळाचे एच. पी. देशमुख, संतोष रेपे, प्रकाश काळे यांसह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बार्टीच्या वतीने आयोजित संविधान रॅलीत चनई चे विद्यार्थी, शिक्षक संविधानप्रेमी व नागरिकांचा सहभाग

## संविधान दिनानिमित्त 'वॉक फॉर संविधान' चे यशस्वी आयोजन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, सामाजिक न्याय विभागाची स्वायत्य संस्था यांच्या वतीने व सांडेश्वर माध्यमिक विद्यालय व सुजन प्राथमिक विद्यालय, संविधान प्रेमी, नागरिक यांच्या पुढाकाराने संविधान दिनानिमित्त 'वॉक फॉर संविधान' रॅली चे आयोजन चनई येथे करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन डॉ. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.

या रॅलीला शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, संविधानप्रेमी, नागरिक व समतादूत व्यंकटेश जोशी यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. या रॅलीची सुरुवात सांडेश्वर माध्यमिक शाळा येथून सुरुवात होऊन शाळेचा परिसर, स्वातंत्र सैनिक कॉलनी, किरमानी नगर, अहिल्यानगर या मार्गाने प्रवास करत परत शाळेत येऊन स्थिरावली. या रॅलीमध्ये सर्व सहभागी सदस्यांनी संविधानाच्या घोषणा दिल्या. संविधान दिनाचे महत्व लोकांना सांगितले. रॅलीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. स्वामी सर, कांबळे बी.एच, सहशिक्षक चव्हाण सर, बोकन सर, वाघमारे सर, तिडके मॅडम, सातपुते मॅडम, शिंदे मॅडम, साळुंके मॅडम, कदम मॅडम, दोन्ही शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. ढोल ताशाच्या गजरामध्ये निनादांमध्ये ही रॅली काढण्यात आली.महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि संविधान प्रास्ताविके चे सामुदायिक वाचन करून रॅलीचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक सुनिल वारे, सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड, समतादूत प्रकल्प अधिकारी जिल्हा बीड श्री. योगेश सोनवणे, यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी चे अंबाजोगाई तालुक्यातील समतादूत व्यंकटेश जोशी यांनी केले होते. या रॅली मध्ये सहभागी होणाऱ्या सर्वांचे आभार व्यंकटेश जोशी यांनी मानले.

# आष्टी विधानसभा क्षेत्रातील वन विभागाचे विविध उपक्रम : आमदार सुरेश धस यांनी घेतला प्रत्यक्ष आढावा

पाटोदा ।प्रतिनिधी

तालुक्यातील प्रादेशिक वन विभाग, वन्यजीव विभाग तसेच नायगाव मयूर अभयारण्यातील सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा आमदार सुरेश धस यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सखोल आढावा घेतला. वन्यजीव संवर्धन, हरितक्षेत्र वाढ, धार्मिक स्थळांचा विकास आणि स्थानिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सुरू असलेल्या कामांची माहिती यावेळी घेण्यात आली.

नायगाव मयूर अभयारण्यातील मोर तसेच इतर वन्य पक्षी-पशूंच्या संवर्धनासाठी वृक्षलागवड, फळझाडे, हरित पट्टे निर्माण करणे, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम जोरात सुरू आहे. हनुमान टेकडी, जवळागिरी देवी, मदरसाहेब दर्गा यांसारख्या ठिकाणांमध्ये मोठी पर्यटन क्षमता असून या जागांचे नियोजनबद्ध विकासाची गरज अधोरेखित करण्यात आली.



याचबरोबर, प्रादेशिक वन विभागांतर्गत आष्टी-पाटोदा येथील श्री रामेश्वर मंदिर (सौताडा), श्री महादेव दरा (बीडसांगवी), श्री शृंगेरीदेवी (ब्रम्हगाव) या धार्मिक स्थळांसाठी तीर्थक्षेत्र विकास निधीमधून सर्वांगीण विकासाची रूपरेषा आगामी काळात राबविण्यात येणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. या कामांमुळे स्थानिक पर्यटन वाढेल तसेच युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे नवे मार्ग खुलतील.

पर्यावरणाचे रक्षण व जैवविविधतेचा समतोल राखण्यासाठी ग्लीरीसिडिया या विषारी वृक्षाचे समूळ निर्मूलन करून त्याऐवजी वन्यजीवांना आवडणाऱ्या झाडांच्या प्रजाती लावण्याच्या प्रस्तावाचा आढावा घेण्यात आला. या प्रजातींमध्ये पिंपळ, सिताफळ, हिरडा, बेहडा, धामोडा, बोर, जांभूळ, पळस तसेच विविध गवतप्रवर्गीय व वेलींच्या जातींचा समावेश आहे.

या बैठकीस वन परीक्षेत्र अधिकारी श्री. काकडे (वन्यजीव - नायगाव मयूर), श्री. अमोल मुंडे (आष्टी), श्री. देवगुडे (पाटोदा-शिरूरकांडा) हे अधिकारी उपस्थित होते.वन संवर्धन, पर्यटन विकास आणि धार्मिक स्थळांच्या उभारणीसाठी दीर्घकालीन नियोजन करून आष्टी-पाटोदा-शिरूर परिसराचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

# श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेसाठी निवड





अंबाजोगाई ( प्रतिनिधी) :- येथील श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी सुमित चाटे व पृथ्वीराज होळंबे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी , क्रीडा व युवक सेवा संचलनालय , महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा , क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पार पडलेल्या विभागस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत १७ वर्ष वयोगट मुले , रिदमीक पियर्स क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांची राज्यस्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या खेळाडूंना विद्यालयातील क्रीडा शिक्षक सतीष बलुतकर व क्रीडा शिक्षीका भाग्यश्री खोसे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे,मार्गदर्शक पालक व शिक्षकांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांतजी मुळे,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह श्री.किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगांवकर,शालेय समितीचे सर्व सदस्य,शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे , पर्यवेक्षक सुर्यकांतउजगरे , पर्यवेक्षिका रूपाली मुळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,ज्योती शिंदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# संविधान दिनानिमित्त बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात विशेष कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.२६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथे भारतीय संविधाना बद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी एक भव्य आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.हा कार्यक्रम एनएसएस विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माधवराव फावडे हे होते.प्रमुख अतिथी म्हणुन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.सी.एन.सोळंके हे होते.कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आली.

डॉ.सोळंके यांनी संविधान हा राष्ट्रजीवनाचा पाया असून त्याचे मनःपूर्वक अध्ययन आणि प्रत्यक्ष आचरण अत्यावश्यक असल्याचे सांगितले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.यादव जे. बी यांनी संविधान रक्षणात युवकांचीभूमिका मांडली.एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. बोबडे ए.आर यांनी सामाजिक समता, जबाबदारी आणि नागरिकत्वाचे भान या बाबतीत मार्गदर्शन केले.



राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.गालफाडे ए.बी यांनी संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली आणि त्यातील प्रगत तत्त्वांचा अर्थ उलगडून सांगितला.लोक प्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ.बिडवे टी.एस यांनी प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या सहभागाची गरज अधोरेखित केली. त्याचप्रमाणे प्रा.डॉ. सरसरे एस.एम यांनी संविधानाधिष्ठित समाज घटकांसाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक आणि जागरूक भूमिका बजावावी असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एकत्र येऊन भारतीय संविधानाची उद्देशिका वाचण्यात आली आणि संविधानिक मूल्यांचे निष्ठेने पालन करण्याची शपथ घेतली.कार्यक्रमाचे संयोजन आणि आयोजन एनएसएस स्वयंसेवकांनी अत्यंत शिस्तबद्धपणे पार पाडले.

# पर्यावरणपूरक निर्णयाने ऊस उत्पादक शेतकरी वर्गात कौतुकाची दाद

## उसाचे पाचट जाळल्याने होत आहेत उत्पन्नात घट

जाफ्राबाद /हरी भालके

निमखेडा बु येथील प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी संजय देवराव चव्हाण यांनी एक आदर्शवत आणि पर्यावरणपूरक पाऊल उचलत यंदापासून ऊसाचे पाचट न जाळण्याचा निर्णय घेतला आहे. तब्बल २५ वर्षांपासून १० एकरांमध्ये ऊस उत्पादन घेणारे चव्हाण यांनी घटते उत्पादन, जमिनीची बिघडत चाललेली पोत आणि वाढते वायूप्रदूषण यांचा अभ्यास करून हा निर्णय घेतल्याचे सांगितले.

तालुका कृषी अधिकारी मा. अमोल शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पाचट जाळण्याऐवजी ट्रॅक्टरच्या सहाय्याने पाचट बारीक करून सऱ्यांमध्ये मिसळण्याची पद्धत अवलंबली. एका एकरात अंदाजे ५ ते ६ टन पाचट जमिनीत कुजवले जाणार असून, यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. परिणामी पुढील हंगामात ऊस उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

तज्ज्ञांच्या मते पाचट न जाळता ते जमिनीत कुजवणे ही शाश्वत शेतीची गरज असून जमिनीतील सेंद्रिय पदार्थ वाढवण्यासाठी ही पद्धत अत्यंत फायदेशीर ठरते. त्यामुळे निमखेडा बु येथील या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की,पाचट जाळण्याऐवजी जमिनीमध्ये कुजवण्याची ही पर्यावरणपूरक पद्धत आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

_जमिनीमधील सेंद्रिय कर्ब हा एक टक्का पाहिजे तर तो सध्या माती परीक्षण केले असता पॉईंट ३० ते पॉईंट ४० आढळून आला असून उसाच्या शेतातील पाचट जाळल्यामुळे तो सेंद्रिय कर्ब कमी होऊन उत्पन्न घटले ,आहे पाचट न जाळल्यामुळे जमीन भुसभुशीत होईल जमिनीचे आरोग्य सुधारेल शेतीला हवे असेल त्या जिवाणूंची वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आतापर्यंत पाचट जाळले तरी यावर्षीपासून पाचट जाळू नये योग्य प्रकारे ट्रॅक्टरच्या सहाय्याने पाचट बारीक करून घ्यावे .



तालुका कृषी अधिकारी श्री अमोल शिंदे




आष्टी येथील गोरक्षनाथ लाड यांची कन्या प्रतीक्षा तिचा भीमराव नागरगोजे यांचे चिरंजीव डॉ. विकास यांच्याशी शाही थाटात विवाह संपन्न झाला. यावेळी वधू - वरांना शुभेच्छा देताना माजी आ. भीमराव धोंडे यांचे बंधू राजेंद्र धोंडे व मान्यवर दिसत आहेत.

### खंडोबा यात्रेनिमित्त आनंदगांव येथे तालुका स्तरीय

# भव्य पशुप्रदर्शनात पशुपालकांनी पशुधनासह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

केज/ प्रतिनिधी

खंडोबा यात्रा निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद,बीड,पशुसंवर्धन विभाग,पंचायत समिती, केज,खंडोबायात्रा समिती व ग्राम पंचायत, आनंदगांव आणि आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता.केज जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे आनंदगांव ता.केज येथ सकाळी ९ ते १२ या वेळात तालुका स्तरीय भव्य पशुप्रदर्शन (वंध्यत्व) आरोग्य शिबीर व पशुपालक मेळावा आयोजित केलेला आहे.



या भव्य पशुप्रदर्शनात शेकडो,हजारो पशुपालकांनी आपल्या पशुधना सह सहभागी व्हावे असे आवाहन पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद,बीड, पशूसंवर्धन विभाग, पंचायत समिती,केज, खंडोबा यात्रा समिती, ग्रामपंचायत,आनंदगांव व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीड यांच्यावतीने प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,खंडोबा यात्रा समिती,ग्रामपंचायत सरपंच सौ.अंजना गोविन्द गायकवाड आनंदगांव ता. केज जि.बीडच्या वतीने केज तालुक्यातील पशु पालकांना करण्यात येत आहे.बीड जिल्हा पशु संवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन आयुक्त,केज तालुका पशुसंवर्धन अधिकारी व केज तालुक्यातील सर्व पशुसंवर्धन अधिकारी, सर्व पशू वैद्यकीय डॉक्टर, कर्मचारी सहभागी होणार आहेत.तरी केज तालुक्यातील पशु पालकांनी हजारोंच्या संख्येने आपल्या पशुधना सह दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता सहभागी व्हावे असे आवाहन आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता.केज जि. बीडचे संस्थापक कार्यवाह प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले आहे.




# केज तालुक्यात कीड आळ्यांचे निकृष्ट धान्य वितरित ; वंचित बहुजन आघाडीची कारवाईची मागणी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील विविध राशन दुकानांमध्ये नागरिकांना मिळणाऱ्या ज्वारीच्या धान्यात मोठ्या प्रमाणात किड,अळया व जाळी आढळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्रनाराजी निर्माण झाली आहे.या गंभीर गैर प्रकाराविरोधात वंचित बहुजन आघाडी च्या वतीने दि.२६ नोव्हेंबर रोजी तहसीलदार केज यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले की, शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत मिळणारे ज्वारीचे धान्य अत्यंत निकृष्ट,अस्वच्छ व आरोग्यास हानिकारक स्वरूपाचे आहे.अशा निकृष्ट धान्याचे वितरण हा ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणारा गंभीर प्रकार असून तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.हे निवेदन लिंबराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात सादर करण्यात आले.यावेळी तालुका प्रवक्ते प्रदीप गायकवाड,सतीश बनसोडे,भैय्यासाहेब आरकडे,दत्ता गायकवाड, पांडुरंग जोगदंड आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रकरणात तातडीने समाधानकारक कारवाई न झाल्यास वंचित बहुजन आघाडीतीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून आ.सुरेश धस यांनी महावितरण अधिकाऱ्यांसोबत घेतली सविस्तर बैठक

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना सतत जाणवणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अडचणी तसेच वारंवार खराब होणारे ट्रान्सफॉर्मर या गंभीर प्रश्नांबाबत आ. सुरेश धस यांनी महावितरणच्या कार्यालयात कार्यकारी अभियंत्यांसोबत सविस्तर चर्चा केली. तसेच शेतकऱ्यांना स्थिर आणि दिवसभर वीज उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजना शासनाने सुरू केली आहे. मात्र यासाठी होत असलेला विलंब टाळता यावा,यामध्ये खासगी कंपन्यांवर प्रशासकीय नियंत्रण असावे जेणेकरून सौरऊर्जेमुळे शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता वाढेल, पिकांना वेळेवर पाणी मिळेल आणि वीजेवरील अवलंबित्व कमी होईल, याबाबत सविस्तर चर्चा केली.



गेल्या काही दिवसांत अनेक गावांमध्ये ट्रान्सफॉर्मर बाबत शेतकऱ्यांनी आ. सुरेश धस यांचेकडे आपल्या व्यथा मांडल्या होत्या. याबाबत महावितरण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची मंगळवारी आ. धस यांनी महावितरण कार्यालयात जाऊन बैठक घेत सध्याच्या काळात पिकांना आवश्यक पाणीपुरवठा होण्यात मोठा अडथळा निर्माण होत असून अनेक ठिकाणी शेतकरी ट्रान्सफॉर्मरची मागणी करत असून याबाबत मी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून अधिकचे ट्रान्सफॉर्मर या आठवड्यात उपलब्ध कसे होतील यावर मी लक्ष देऊन असल्याचे सांगत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जळालेले किंवा क्षमतेअभावी बंद पडलेले ट्रान्सफॉर्मर याची माहिती आपल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून २ दिवसात मिळवावी आणि त्या ठिकाणी आवश्यक तो पूर्ण क्षमतेने दिवसा वीजपुरवठा देण्यावर भर द्यावा अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच जिथे दुरुस्तीचे काम अनावश्यकपणे दिवसन्दिवस लांबू न देता

शेतकऱ्यांना वेळेवर आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने स्टाफ व साहित्य उपलब्ध करण्यावर भर देण्याचा सूचना देखील केल्या. यावेळी त्यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, नगरसेवक शरीफ शेख, भाऊसाहेब निंबाळकर, इम्रान तांबोळी आदी उपस्थित होते.

# युवकांमुळे त्या हरणाला जीवदान !

पाटोदा । प्रतिनिधी ,

धनगर जवळका शिवारामध्ये दि. २४ रोजी रात्री नऊ वाजता एक गाडीने हरणाला जोरदार धडक दिल्याची माहिती मिळताच. घटनास्थळी पोहोचल्यावर हरण जखमी अवस्थेत रस्त्याच्या खालील खड्ड्यात पडलेले आढळले. मित्रमंडळींनी कोणताही विलंब न करता हरणाला सुरक्षितपणे बाहेर काढले व शिरूरला पाठवले याबाबत अधिक माहिती अशी की एक हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली होती त्यावेळी सर्व गावकऱ्यांनी मिळून त्या हरणाचे प्राण वाचवले होते.

या प्रकरणाची माहिती वनविभागाला दिली असता त्यांनी हरणाला उपचारासाठी सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे पाठवण्याचा सल्ला



असता पाठवलं या बचाव मोहिमेत गावातील अनेक युवकांनी पुढाकार घेतला यामध्ये सचिन मेगडंबर. अजित काळे, सावकार काळे, अविनाश काळे, सागर गाडेकर, शंकर गोरे, नाना ढेकळे, वसंत गाडेकर यांचे विशेष योगदान राहिले.


# चोभा निमगाव परिसरातील पुरात वाहून गेलेले विजेचे पोल दोन महिने झाले तरी नादुरुस्तच

## महावितरणचा कारभार चव्हाट्यावर

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे व पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे.यात अनेक ठिकाणी विजेचे खांब पुरामुळे वाहून गेल्याने वीज पुरवठा बंद आहे.आता दोन महिने झाले तरीही चोभा निमगाव परिसरातील विजेच्या तारा व खांबांची दुरुस्ती न झाल्यामुळे शेतकरी वर्गावर महावितरणने पुन्हा नवे संकट उभे केले आहे.

सप्टेंबर २०२५ महिन्यात कांबळी नदीला दोन वेळा आलेल्या महापुरामुळे नांदा आणि निमगाव चोभा परिसरातील नदीकाठची सर्व पिके वाहून गेली.




सोबत विजेचे खांबही वाहून गेले. या परिसरात जोशी मळा (निमगाव चोभा) हद्दीतील डीपीवरून छगन बनसोडे (नांदा) यांच्या विहिरीपर्यंतचे ८ खांब आणि तारा वाहून गेल्या. या परिसरात ७ विहिरी असून, जवळजवळ ५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. खरीप पीक वाहून गेले असून, उरलेल्या पिकाला पाणी देता येत नाही. त्यामुळे रब्बीची पेरणीही थांबली आहे. परिसरातील शेतकरी वारंवार कडा, आष्टी येथील महावितरण कार्यालयात पाठपुरावा करत आहेत, परंतु त्याची दखल घेतली जात नाही. येत्या चार दिवसात विजेची समस्या न सोडल्यास शेतकरी महावितरण कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# सोशल मीडिया वरील बिबट्याची पाटोदा शहरात दहशत,खोटी अफवा पसरवणाऱ्या पोलिसांनी कारवाई करावी

पाटोदा ( प्रतिनिधी )

सध्या पाटोद्यात सोशल मिडिया वर बिबट्या येथे आला तिथे आला अशाप्रकारे -ख प डाऊनलोड करुन बिबट्याचा फोटो तयार करून तो ग्रुपवर किंवा फेसबुकवर टाकुन खोटी अफवा पसरवून जनतेत भितिचे वातावरण निर्माण करणाऱ्या अशा नालायकाला सायबर क्राईम द्वारे पोलिसांनी शोधुन गुन्हा दाखल करुन त्याचेवर खोटी अफवा पसरवून जनतेत भितिचे वातावरण तयार करून संभ्रम निर्माण केल्या प्रकरणी त्याला चांगला चोप देऊन गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करावी अशी मागणी जनतेतुन होत आहे.

सध्या पाटोद्यात सोशल मीडियावर बिबट्या येथे आला तिथे आला यांना दिसला त्यांना अशा प्रकारे खोट्या अफवा पसरवून -ख पद्वारे बिबट्याची पोष्ट तयार करून व्हायरल करून खोटी अफवा पसरवून जनतेत भितिचे वातावरण निर्माण करणाऱ्या नालायक प्रवृत्तीच्या मनोरुग्णावर जिल्हा पोलिस अधीक्षक व पाटोदा पोलिसांनी त्यांचेवर गुन्हा दाखल करुन चांगला चोप देऊन कठोर कारवाई करावीकारण अशा खोट्या



अफवा पसरविल्या मुळे लोकांमध्ये व लहान मुलांमध्ये घबराट पसरली असून लोक, महीला भगिनी व लहान मुले घराबाहेर पडायला भित आहेत.पोलीस प्रशासनाने सोशल मीडिया वर व थहर्रीर्रा ग्रुपवर तसेच ज्यांनी कोणी स्टेटस ठेवले आहे अशा खोट्या पोष्ट केल्या असतील त्यांचेवर सायबर क्राईम द्वारे माहिती काढून संबंधितांवर पोलिसात गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करावी अशी मागणी जनतेतुन होत आहे.

# ९१ व्या मराठी साहित्य संमेलनात गर्कळ निमंत्रीत !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवान गडाच्या पायथ्याशी असलेल्या घोगस पारगावचे कवि बाळासाहेब गर्कळ यांना सातारा येथे होऊ घातलेल्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रीत केले आहे .एकेकाळी ऊसतोड मजुराचा म्हणून ओळख असलेल्या शिरूर तालुक्यात आता विविध क्षेत्रात नावलौकिक होतांना दिसून येतो यात शासकिय सेवेत श्रेणी एक दोन पासुन भरती होतांना तालुक्याचा स्वाभिमान वाटतो त्याचबरोबर साहित्य क्षेत्रात देखील दमदार लेखक कवी घडत असुन आपल्या बौध्दिक बळावर लिखानातून ठसा उमटवत आहे ,मागासलेला तालुका असला तरी तालुक्यात राज्यस्तरावर देशपातळीवर नावलौकिक



कमावणारे आहेत .साहित्य क्षेत्रात तर कवी लेखक यांनी वेगळे वर्चस्व सिध्द केले असल्याने आपले काव्य सादरीकरणसाठी सातारा येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बाळासाहेब गर्कळ यांना निमंत्रीत केले आहे .गर्कळ यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे .

# शिरूर कासार तालुक्यात स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह प्रकल्पाला प्रशासनाची हिरवी झेंडी

## १३.७९ कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी आ.सुरेश धस

पाटोदा ।प्रतिनिधी

स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींना सुरक्षित, गुणवत्तायुक्त व परवडणाऱ्या निवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शिरूर कासार तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास आज यश मिळाल्याने ऊसतोड कामगार कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

हा प्रकल्प मौजे वारणी (गट क्र. २५९) येथे उभारण्यात येणार असून, मुलांच्या वसतिगृहासोबतच मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित व सर्व सुविधांनी युक्त वसतिगृहाची उभारणी केली जाणार आहे. या परिसरात आयडियल इंग्लिश स्कूल, मॉडर्न इंग्लिश स्कूल, केशवराज माध्यमिक विद्यालय, संत वामनभाऊ विद्यालय, राजीव गांधी महाविद्यालय व शासकीय खढख यांसारख्या प्रमुख शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने, स्थलांतरित कुटुंबांतील मुलींचे शिक्षण कायम राहण्यासाठी या वसतिगृहाची आवश्यकता अधिक भासू लागली होती.

प्रकल्पाचे वैशिष्ट्ये -

* २३९३.०५ चौरस मीटर बांधकाम क्षेत्र
* तीन मजली आधुनिक इमारत
* पूर्ण पाणीपुरवठा व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृह व विद्युत सुविधा
* सोलार रूफटॉप व रेन वॉटर हार्वेस्टिंग
* मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सर्व मूलभूत सुविधा व फर्निचर
* परिसर विकास, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज, बगीचा
* सर्व तांत्रिक मान्यता, पर्यावरणीय मानदंडांचे पालन
* शासन नियमावलीनुसार काटेकोरपणे अंमलबजावणी

स्थलांतरामुळे प्रत्येक वर्षी शिक्षण खंडित होणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या मुलींना शैक्षणिक प्रगतीची नवी दिशा देणारा हा निर्णय ऐतिहासिक ठरत आहे. या प्रकल्पामुळे शिरूर कासार तालुक्यातील विद्यार्थिनींना सुरक्षित, स्वच्छ, सुसज्ज व शैक्षणिक वातावरण लाभणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासास मोठी चालना मिळणार आहे.

या निर्णयामुळे -

* स्थलांतर कमी होण्यास मदत
* मुलींच्या शिक्षणातील सातत्य टिकून राहणार
* सुरक्षित निवासामुळे पालकांची चिंता दूर




* समाजकल्याणाच्या दिशेने महत्त्वाची पायरी

ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा वसतिगृह प्रकल्प महत्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# आज गेवराईत पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा

## बहुसंख्येने उपस्थित रहा - बदामराव पंडित

गेवराई ( प्रतिनिधी ) गेवराई नगर परिषद निवडणुकीतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ गीताभाभी बाळराजे पवार आणि सर्व सदस्य पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आज गेवराईत भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेला तमाम गेवराईकरांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व २२ नगरसेवक पदासाठी दिनांक २ डिसेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने प्रचारात आघाडी घेतली असून गेवराईकरांची मोठी साथ पॅनलच्या सर्व उमेदवारांना मिळताना दिसत आहे. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ गीताभाभी बाळराजे पवार आणि सर्व २२ उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता भगवती टॉकीज समोरील भव्य प्रांगणात भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय



सरचिटणीस तथा राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा होणार आहे. या पार्श्वभूमीवर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेऊन आपापल्या प्रभागातील मतदारांना या सभेचे निमंत्रण देण्याच्या सूचना केल्या आहेत. गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या नगराध्यक्षसह सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आयोजित केलेल्या या सभेला गेवराई शहरातील महिला व पुरुष मतदारांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

# श्रीकांत घुले उमरी पंचायत समिती गणातून निवडणूक लढवणार?

केज/ प्रतिनिधी

स्थानिक राजकारणा मध्ये सध्या चर्चा रंगली आहे की,उद्योजक श्रीकांत घुले यांनी आगामी पंचायत समिती निवडणुकीसाठी उमरी गणातून उमेदवारी घ्यायची तयारी चालू ठेवलीआहे.गावात आणि आसपासच्या परिसरात स्थानिक जनता,कार्यकर्ते तसेच काही राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यात चर्चा सुरु आहे की,जर श्रीकांत घुले मैदानात उतरले तर ते निवडणुकीत महत्वाची भूमिका बजावू शकतात.श्रीकांत घुले यांच्या मागे राजकीय पाठबळ व समाजात त्यांची ओळख,यामुळे निवडणुकीत त्यांच्या उमेदवारीने स्थानिक व मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. जर ते निवडणुकीत उतरणार हे स्पष्ट झाले,तर उमरी पंचायत समिती गणातील सर्व मतदार, पक्ष आणि नागरिकांचे मत सुद्धा बदलू शकते या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांतच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता सुत्रांकडून व्यक्त होत आहे.

शैक्षणिक संस्था, वेदांत कलेक्शनच्या माध्यमातून वाढता जनसंपर्क याचा उमरी पंचायत समिती निवडणुकीत होऊ शकतो फायदा :- स्थानिक पातळीवर शैक्षणिक संस्था,वेदांत कलेक्शन या व्यवसायाच्या माध्यमातून सुरू असलेला दांडगा जनसंपर्क आगामी उमरी पंचायत समिती निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, अशी चर्चा सध्या गावोगावी रंगत आहे. विविध सामाजिक कार्याच्या जोरावर श्रीकांत घुले यांनी नागरिकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे.



ग्राहकांना उत्तम सेवा, विविध योजनांच्या माध्यमातून दिला जाणारा फायदा आणि लोकांशी राखला जाणारा सातत्यपूर्ण संपर्क यामुळे वेदांत कलेक्शनचे नाव गावा गावात घराघरात पोहोचले आहे.त्यामुळे या जनसंपर्काचा थेट फायदा निवडणूक प्रक्रियेत उमेदवारी करणाऱ्या संबंधित श्रीकांत घुलेना मिळू शकतो,असे मत व्यक्त केले जात आहे.

सध्या उमरी परिसरात निवडणुकीच्या हालचालींना वेग आला असून,जनतेचा पाठिंबा कोणाच्या बाजूने झुकतो याची उत्सुकता वाढली आहे.व्यवसायातून निर्माण झालेला लोकांचा विश्वास व प्रत्यक्ष संपर्क या घटकांचा निवडणूक निकालावर प्रभाव पडण्याची दाट शक्यता असल्याचे जाणकार सांगतात.उमरी पंचायत समितीचा विश्वास संपादन करण्या साठी असलेली ही स्पर्धा कोण जिंकणार,हे येणारा काळच ठरवणार आहे. दरम्यान उमेदवारी मिळाली तर श्रीकांत घुले यांचा प्रभाव मतदानातून दिसून येणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# अवैध रित्या रेती उपसा करणाऱ्या ८ घाटावर एकाच दिवशी छापा टाकून ग्रामीण पोलीसांची कारवाई

## ३७ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त

नांदेड :- गोदावरी नदी पात्रात बोटीच्या साह्याने फिरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कंड, पिंपळगाव, भनगी, वाहेगाव आणि गंगाबेट . या परिसरात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा कारवायांचा पर्दाफाश केला. या मोहिमेत एकूण ३७ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून काही साहित्य शासनाच्या नियमांनुसार नष्ट करण्यात आले आहे.

पोलिस अंमलदार शंकर माळगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज सकाळी नऊ वाजता नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक नदीपात्रात कारवाईसाठी रवाना झाले. या पथकात ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, तसेच पोलीस अंमलदार मुंडे, श्याम भोसले, शेख, शंकर माळगे, सिरमलवार, चावरे, शेख जमीर, शेख आसीफ . धम्मपाल कांबळे . लव्हारे आदी नी या



कारवाईत सामावेश होते .

पथकाने कल्लाळ परिसरातून बोटीच्या साह्याने नदिपात्रातील लपवुन ठेवलेले साहित्य मिळण्यासाठी गस्त घालून अनेक ठिकाणी धाड टाकुन तेथे अवैध रित्या रेती उपसा होत असल्याचे निर्दशनास आले असता त्या ठिकाणी धाडी टाकून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला यात १० ब्रास रेती किंमत ५० हजार रुपये ५४ तराफे किंमत २७ लाख ३ इंजिन किंमत ९ लाख १२ लोखंडी ड्रम किंमत १२ हजार १५ प्लास्टिक ड्रम किंमत ९ हजार १७ लोखंडी पाईप किंमत ५१ हजार असा एकुण ३७ लाख २२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला तर काही शासनाच्या नियमप्रमाणे जागेवर नष्ट करण्यात आला असून या प्रकरणात अरोपी संतोष हंबर्डे रा विष्णुपूरी त्यांच्या सोबत संजीवन बिन हारून बिन व वकील मिश्री साहनी यासह इतर तिन जणावर गुन्हा क्र ११३५ / २०२५ प्रमाणे नोंदवण्यात आला आहे या कारवाई बद्दल पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधिक्षक प्रशांत शिंदे यांनी ग्रामीण पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर व कर्मच्यारी यांचे

# जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया चे प्राचार्य श्री. सारोक्ते देवराम गोगा यांना 'संविधान गौरव पुरस्कार' जाहीर

## ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथे विविध मान्यवरांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण

वडवणी ।प्रतिनिधी

दि बौद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने संविधानाचा ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त प्रतिष्ठित संविधान गौरव पुरस्कार यावर्षी विद्यालयाचे प्राचार्य श्री सारोक्ते डी जी सर यांना जाहीर झाला आहे. गौरव संविधानाचा कार्यक्रमात ३० नोव्हेंबर रोजी सावित्रीबाई फुले सभागृह पिंपरी चिंचवड पुणे येथे या पुरस्काराचे वितरण विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु तालुका वडवणी जिल्हा बीड वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील गरीब व होतकरू मुले मुली यांच्या शिक्षणासाठी



खेडोपाडी ज्ञान गंगा पोहचवणाऱ्या बीड जिल्ह्यातील बुलंद तोफ,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या , आमच्या मार्गदर्शक, संस्था अध्यक्षा मा.प्रा.सुशीलाताई मोराळे मॅडम यांच्या मार्गदर्शनात आपल्या कार्याची सुरवात करत शालेय विद्यार्थ्यांना विविध उपक्रम राबविण्यात आले. विविध प्रकारच्या स्पर्धा, स्पर्धा परीक्षा राबविणे, त्याच बरोबर सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात आले.तसेच महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग द्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमात पहिल्याच कार्यक्रम टप्प्यात सदरील शाळा तालुक्यातून ग्रामीण भागात तिसऱ्या क्रमांकावर विजेती झाली व तिसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली. तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी,पालक वृंद, व सर्व सहकारी कर्मचारी वृंद यांच्यात यांच्यातील समजूतदार मनमिळावू व स्नेहपूर्ण प्रेमळ असे सरांचे सबंध सर्व शिक्षण क्षेत्रात असल्याने अल्पावधीतच त्यांनी सर्वांना आपलेसे केले त्यांची सहकार्याची भूमिका ही सदैव मोलाची अशी राहिलेली आहे अल्पावधीतच त्यांची ही यशकीर्ती त्यांच्या कार्यकुशलते मुळे वाढीस आली. असे सन्माननीय प्राचार्य श्री. सारोक्ते डी जी सर यांची सदरील पुरस्कारासाठी निवड केलेली आहे.

तरी संविधान गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्था अध्यक्षा,सचिव,संस्था पदाधिकारी तसेच विद्यालयातील सर्व घाडगे सर, टाले सर, हंगे सर, यादव सर,येवले सर,चोपडे सर,तयार मॅडम, मुंडे सर, गोंदरे जी एम,काळे व्ही डी,पाखरे व्हि जी,ससाणे जी एल शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी माजी विद्यार्थी मंडळ व समस्त ग्रामस्थ कवडगाव बु यांच्या वतीने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि. बौध्दिष्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेचे चेअरमन श्री.शिवाजीराव झोडगे यांनी केले आहे.*

# अंबाजोगाईच्या विकासासाठी डॉक्टरांशी आ. नमिता मुंदडा यांचा महत्वपूर्ण संवाद

## शहरपरिवर्तन जनविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोरजी मुंदडा यांना मतदान करण्याचे आवाहन

अंबाजोगाई- प्रतिनिधी

दि २७ रोजी आगामी अंबाजोगाई नगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई शहरविकास,प्रगतीसाठी आपली भूमिका स्पष्ट करून शहरातील डॉक्टरांशी संवाद साधला. नंदकिशोर मुंदडा हे हि यावेळी उपस्थित होते. आरोग्य ,विकास,आणि काकजींची बांधिलकी या बैठकी दरम्यान मांडण्यात आली. अंबाजोगाईच्या भविष्यातील विकास योजना विशेषतः सद्याच्या समस्या आणि त्यांचे निवारण यासाठी शहर परिवर्तन विकास आघाडीची सर्वसमावेशक भूमिका यावर सविस्तरपणे चर्चा झाली.यामध्ये आरोग्यसेवा सुधारणे अधिक सक्षम वैद्यकीय आणि आरोग्यसेवा पुरवणे ,स्वछता व



पायाभूत सुविधांचा विकास करणे,सक्षम प्रशासनातून नागरिकांचे समस्या त्वरित सोडवणे या साठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभरने असे विविध मुद्दे होते. या वेळी सर्व डॉक्टर बंधू भगिनी यांनी नंदकिशोरजी मुंदडा यांच्यावर विश्वास व्यक्त करून या निवडणुकीत छत्रीलाच मतदान करून विकासाच्या कार्यात हातभार लावू असा विश्वास हि दिला.

# तांबाराजुरी जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांनी अनुभवला आठवडी बाजार

## कोणी विकले पोहे;तर कोणी विकले दही धपाटे

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी मध्ये बुधवार (दि.२६) रोजी कोणी वडापाव, भजे , चहा,शाबू वडे, पोहे विकले,कोणी दही धपाटे विकले तर कोणी आपल्या शेतातील भाजीपाला विकून आठवडी बाजाराचा अनुभव घेतला.विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने यंदाही जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा तांबा राजुरी आयोजित आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले. या बाजारात जवळ - जवळ बारा ते पंधरा हजारापर्यंत उलाढाल झाली.

६८ विद्यार्थी संख्या असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या बाजाराचे नियंत्रण केले.मुलांनी आपल्या शेतातून आणलेला भाजी-पाला





कांदे,बटाटे ,कोथिंबीर, टोमॅटो, भेंडी, गवार, लसूण, पेरू, लिंबू, केळी यासह खाद्यपदार्थांमध्ये दही धपाटे, शाबु वडे, वडापाव, मसाला पापड, पोहे, भजे,बिस्किट, चॉकलेट, चिक्की आदी पदार्थ विद्यार्थ्यांनी बाजारात विक्रीसाठी ठेवले होते.

बाजारातून गावातील महिला व पुरुष, पालक, ग्रामस्थ यांनी आवर्जून लहान मुलांकडून खरेदी केली.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री बबन पवार सर, गणेश तांबे ग्रा.पं.सदस्य केशव तांबे, विकास तांबे, विलास तांबे, भुजंग तांबे, इनुस शेख, हरिदास तांबे सर, अण्णासाहेब तांबे, मधुकर तांबे, शालेय समितीचे सर्व सदस्य आदी ग्रामस्थांनी बाजाराला भेट देऊन मुलांचे कौतुक करून खरेदी केली. तसेच महिलांची उपस्थिती विशेष होती, सर्व महिलांनी चिमुकल्यांकडून खरेदी केली.यावेळी बोलताना केंद्रप्रमुख श्री मळेकर सर म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी शिक्षकांच्या संकल्पनेतून आठवडी बाजार उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना खरोखरच खूप काही शिकायला मिळते. सोबतच गणित विषयाशी निगडित अन्य व्यावहारिक ज्ञानही त्यांना मिळते. शाळा विविध उपक्रम नेहमीच राबवत असते,यापुढेही राबवले जातील असे केंद्रप्रमुख श्री मळेकर सर यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक गाडेकर मॅडम,तांदळे सर, वायकर मॅडम,रहाटे मॅडम अनिकेत तांबे सर यांनी परिश्रम घेतले.

# वडवणी पोलिसांच्या रक्तदान शिबीरात ५६ जणांचे रक्तदान

## खाकीच्या सामाजिक दायित्वाचे सर्वत्र कौतुक

वडवणी (प्रतिनिधी) :- वडवणी ठाण्याच्या वतीने रक्तदान शिबिर घेत शहीद पोलीसांना श्रद्धांजली अर्पण. भारतीय संविधान दिन तसेच २६ / ११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात जनतेची सुरक्षा करताना पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी व जवान कर्तव्य बजावत असताना त्यांना वीरमरण आले.शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने काल दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबीरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन हे शिबीर यशस्वी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात पोलिस




दलातील शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, पोलिस उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली

व वडवणी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या संकल्पनेतून वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने काल दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत वडवणी पोलिस ठाण्याच्या समोरील प्रांगणात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पोलिस प्रशासनासह समाजातील सर्व घटकांनी व रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन वडवणी पोलिस ठाण्याच्या

सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी केले होते. त्यांच्या याच आवाहनाला वडवणीकरांनीही भरभरुन प्रतिसाद देत दिवसभरात या रक्तदान शिबीरातून तब्बल ५६ रक्तदात्यांनी आपले बहूमोल असे रक्तदान केले. यावेळी रक्तदान केलेल्या प्रत्येक रक्तदात्याला वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने एक प्रशस्तीपत्र व गुलाब पुष्प देवून त्यांचे आभार मानण्यात आले. तसेच रक्तदात्यांसाठी नाष्ट्याचीही व्यवस्था यावेळी करण्यात आली होती.

# स्वातंत्र्यसैनिक किसन पवार यांचे निधन

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कोहिणी गावातील ज्येष्ठ नागरिक व स्वातंत्र्यसैनिक कालकथित किसन यादव पवार यांचे रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे या परिसरात हळ



हळ व्यक्त केली जात आहे. माणुसकीचा ठेवा असलेल्या आणि शांत, संयमी स्वभावामुळे ज्येष्ठांपासून तरुणांपर्यंत सर्वांच्या मनात आपुलकीची जागा निर्माण करणाऱ्या या व्यक्तिमत्वाचे गावात विशेष स्थान होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी निभावलेल्या योगदानाची गावकऱ्यांनी आजही कायम आठवण ठेवली आहे. त्यांच्या पार्थिवावर अंतिम जलदान विधी मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोहिणी येथे करण्यात येणार आहे. त्यांच्यापाठीमागे मागे पत्नी भामाबाई किसन पवार, महादेव पवार, बाबासाहेब पवार, दादासाहेब पवार हे तीन मुले असा परिवार आहे.

# दावरवाडी जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत पालक मेळावा उत्साहात संपन्न

दावरवाडी /प्रतिनिधी

दावरवाडी जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेत पालक सभा उत्साहात पार पडली.

पालक सभेची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मल्हारी सोरमारे, उपाध्यक्ष बाळासाहेब एडके, विष्णु सोरमारे, दादासाहेब तांगडे, प्रभाकर नन्नवरे यांनी प्रतिमा पूजन करुन दिप प्रज्वलन केले.

प्रसंगी सर्व पालकांचे सत्कार पुष्पहार घालून व शॉल देऊन अभिनंदन करण्यात आले. सध्याच्या काळामध्ये पालकांनी आपल्या मुलाकडे लक्ष देणे गरजेचे आहे आपला मुलगा शाळेत जातो की नाही हे पण पालकांनी चार आठ दीवसानी शाळेत जाऊण शिक्षक यांना विचारपुस करावी हे पण पालक यांची जवाबदारी आहे दावरवाडी जिल्हा परिषद शाळा केंद्रामध्ये तिसऱ्या क्रमांकावर शिक्षणाबाबत उच्च दर्जा असलेली शाळेची नेमणूक झालेली आहे

छत्रपति संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. दिलीप स्वामी यांच्या यांच्या आदेशानुसार चालू असलेल्या दशसूत्री या उपक्रमांतर्गत दहा सूत्रांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शाळेचे वातावरण, विविध उपक्रमांमध्ये सहभाग, पालक-शाळा समन्वय, शैक्षणिक प्रगती तसेच शिस्त यांसारख्या विषयांवर केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक श्री राम तांगडे सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पालकांनी त्यांच्या मते, अपेक्षा आणि सूचना मोकळेपणाने मांडल्या.

यावेळी शिक्षक वृंद व शिक्षीका विष्णू नागरगोजे, पल्लवी सोळंके, सरोज हांडे, वैशाली मुळे, प्रिती



परळकर, परमेश्वर खराद, पांडूरंग सानप, सचिन तहकिक यांनी याप्रसंगी दशसूत्री कार्यक्रम यावर अधिक प्रकाश टाकून सर्व पालकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विष्णू नागरगोजे सर यांनी केले.

शेवटी इस्माईल शेख, ज्ञानेश्वर मानधरे व सर्व उपस्थित पालकांनी शाळेच्या प्रगतीसाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी सुचवलेल्या सूचना प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

पालक सभेचा समारोप अतिशय उत्साहात व समाधानाच्या वातावरणात संपन्न झाला. या पालक मेळाव्यासाठी गावातील नागरिक विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती दर्शवली होती



# ग्रुप ग्रामपंचायत मध्ये संविधान दिवस साजरा....!

दावरवाडी / पुढारी वृत्तसेवा

दावरवाडी येथे ग्रुप ग्रामपंचायत मध्ये मोठ्या उत्साहात संविधान दिवस साजरा करण्यात आला प्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर संविधान दिवसावर ग्रामपंचायत च्या वतीने चर्चा करण्यात आली यावेळी उपस्थित अंगणवाडी महिला कर्मचारी यांच्याकडून संविधान दिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले त्यावेळी उपस्थिती ग्रामपंचायत मधील सरपंच डी.डी.जाधव उप सरपंच प्रशांत देशमुख सदस्य शाम दादा तांगडे अरविंद तांगडे नाथा सोरमारे प्रविण खांडे नानासाहेब एडके काका साहेब एडके रोजगार से.शिवाजीराव तांगडे ग्रामपंचायत कर्मचारी गणेश गिरी सुनील घनवट प्रभाकर नन्नवरे संतोष जबडे विष्णू सोरमारे व गावातील नागरिक हजर होते

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुतेची आराधना करणारे भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ..

## शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांचे प्रतिपादन..



नवीन नांदेड-समता, स्वातंत्र्य, न्याय बंधुता या तत्त्वांची आराधना करणारे भारतीय संविधान जागतिक स्तरावर सर्वश्रेष्ठ गणले गेले आहे. अशा भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आणि कर्तव्य प्रत्येक भारतीयाने जाणून घेऊन तसे अवलोकन केले पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड येथील विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांनी केले. श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड येथे भारतीय संविधान दिन उत्साह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब भोसले बोलत होते. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शेटे एस.व्ही., उपप्राचार्य डॉ. व्ही आर. राठोड यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ.व्ही.एम देशमुख यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. नांदेड विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यावेळी बोलताना पुढे म्हणाले, भारत देश हा विविध प्रांत,भाषा आणि विविधतेने नटलेला आहे. असा संपूर्ण देश एका संविधानाच्या परिपूर्णतेमुळे आज एकसंघ झालेला पाहायला मिळतो. प्रत्येक भारतीयाला आज भारतीय संविधान सुरक्षिततेची भावना-हमी देतो; हे या संविधानाचे मोठे वैशिष्ट्य आहे,असेही ते यावेळी म्हणाले.

प्रशासन, न्यायपालिका आणि शासन हे भारतीय संविधानाचे प्रमुख घटक असून जगामध्ये सर्वोत्तम लोकशाहीचा दस्तावेज म्हणून भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ ठरले आहे, असे मत यावेळी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. शेटे एस. व्ही.यांनी भारतीय संविधानावर विस्तृतपणे अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शशिकांत हटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. व्ही.एम. देशमुख यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रो.डॉ.रेणुका मोरे,प्रो.डॉ.नागेश कांबळे, डॉ.आर.एम.कांगणे, डॉ.दिलीप पालीमकर, डॉ. यु एस कानवटे,डॉ.साहेबराव मोरे,डॉ.गणेश लिंगमपल्ले,डॉ.संतोष शिंदे, डॉ.संजय गिरे,डॉ.विजय मोरे, प्रा. किशोर सूर्यवाड, प्रा.कविता हंबर्डे, प्रा. जायदे,से.नि.कार्यालयीन अधीक्षक आर.डी राठोड, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.




# भव्य संविधान सन्मान रॅली ने तामसेकरांचे लक्षवेधले

तामसा /प्रतिनिधी

संविधान दिनाच्या औचित्य साधून तामसा येथे भव्यदिव्य संविधान सन्मान रॅली न तामसेकऱ्यांचे लक्षवेधले.तामसा येथे संविधान दिनानिमित्त विविध ठिकाणी संविधान सन्मान रॅली काढण्यात आली विद्यासागर मुलीचे हायस्कूल, पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेतमजूरवाडी या शाळेच्या विध्यार्थीयांनी शहरात प्रभात रॅली काढून डॉ बाबासाहेब आंबेडकर च्या जयघोष देत हातात संविधानाचे पुस्तक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर च्या प्रतिमा चे, डॉ बाबासाहेब प्रतिकृती वेशभूषा धारणकरून भव्यदिव्य सन्मान रॅली काढण्यात आली. आंबेडकर नगर पासून शहरात मुख्यमार्गाने रॅली छत्रपती शिवाजी महाराज चक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चक मार्गे बुद्ध विहार येथे संविधान सन्मान रॅली चा समारोप करण्यात आलं या रॅलीत भीम टायगर सेना संस्थापक दादासाहेब शेळके, वंचित बहुजन आघाडी चे युवा तालुका अध्यक्ष जयकीन रावळे, प्रतिष्ठित व्यापारी उद्योजक सचिन औटे,विध्यार्थी आघाडी चे विशाल भालेराव, रत्नाकर जाधव, मुन्ना जाधव, अंकुश जाधव,रवी वाघमारे, विठ्ठल हनवते, यशवंत वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य आकाश जाधव,राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी तालुका अध्यक्ष मनीषा जाधव, भीमराव कांबळे, मुकिंद रावळे, अरविंद रावळे, आकाश जाधव सह आंबेडकर प्रेमी महिला पुरुष संविधान सन्मान रॅलीत सहभागी झाले

# स्वारातीम विद्यापीठाच्या १ व २ डिसेंबरच्या परीक्षा रद्द

नांदेड /जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२५ परीक्षांना ११ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. दरम्यान, दि. २ डिसेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वजनिक निवडणुकीसाठी मतदान होत असल्याने आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांचा मतदान केंद्रम्हणून वापर होत असल्यामुळे दि. १ डिसेंबर व २ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांनी दिली.

रद्द झालेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येणार असून याबाबत सर्व विद्यार्थ्यांनी अद्ययावत वेळापत्रकाची नोंद




घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, तसेच ही सूचना सर्व संबंधित विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचवावी, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'अन्वेषण २०२५-२६' संशोधन स्पर्धेचे भव्य आयोजन

## १३० विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचे दमदार सादरीकरण

नांदेड /जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन 'अन्वेषण २०२५-२६'

चे मंगळवारी (२६ नोव्हेंबर) विद्यापीठ परिसरातील औषधनिर्माणशास्त्र संकुलात दिमाखात उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन संपन्न झाले.



यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार, तसेच डॉ. एच. एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय विद्यापीठ संघाद्वारे देशभर राबविण्यात येणारा 'अन्वेषण' हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व्यक्त केले. विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवकल्पनाशक्ती बळकट करण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वपूर्ण असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या अधिवेशनात कृषी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी-तंत्रज्ञान, आरोग्य व समृद्धी विज्ञान, फार्मसी, समाजशास्त्र, वाणिज्य-कायदाआणि आंतरशाखीय संशोधन अशा सहा प्रमुख विभागांतर्गत ७४ संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण झाले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालये व संकुलांतील एकूण १३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

स्पर्धेत सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, स्वप्निल कांबळे, वैष्णवी हेसे, वैष्णवी मलेवाड, गौतम दूरगम, आदित्य मोदिराज, यश जाभुरकर, विशाल वाडेकर, दिगंबर आजल आणि गीतांजली आबादे यांनी सादर केलेल्या प्रकल्पांना प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी वेस्ट झोन 'अन्वेषण' स्पर्धेत, सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ, आनंद (गुजरात) येथे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

अधिवेशनाच्या यशस्वी नियोजन व अंमलबजावणीमध्ये संगणकशास्त्र आणि भूशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांसह डॉ. राजेश्वर क्षीरसागर आणि शंकर हंबर्डे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# लोकआग्रहास्तव राधाबाई सलाम मांडवी पंचायत समिती निवडणूक लढवणार

किनवट/प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया जवळ येत असताना इच्छुक उमेदवारांची लगबग सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर किनवट तालुक्यातील मांडवी जिल्हा परिषद गट अंतर्गत येणारा मांडवी पंचायत समिती गण सर्वसाधारण खुला आरक्षित झाला आहे. त्यामुळे या प्रवर्गातील आणि परिसरातील ओळखीच्या सामाजिक कार्यकर्त्या राधाबाई पुसाराम सलाम यांनी ही निवडणूक लढवावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पूर्वी देखील राधाबाई सलाम यांनी निवडणूक लढवली होती. त्या वेळी अत्यल्प मताने त्यांचा पराभव झाला असला, तरी त्यांचे सातत्यपूर्ण सामाजिक कार्य आणि लोकांशी असलेले घट्ट नाते पाहता यंदा त्यांना मोठ्या प्रमाणावर लोक पाठिंबा देत आहेत.



राधाबाई सलाम गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी, वंचित, ग्रामीण वस्तीतील समस्यांसाठी सतत लढा देत आहेत. प्रशासनाकडे नागरिकांचे प्रश्न धाडसाने मांडणे, अधिकारी वर्गाशी सातत्याने पाठपुरावा करणे, आंदोलनांमध्ये अग्रेसर भूमिका घेणे-ही त्यांची कार्यशैली असल्याने त्या परिसरात लोकप्रिय आहेत. त्या स्वतः आदिवासी प्रधान समाजातून येत असून माळी समाज, बंजारा समाज, तेलगू भाषिक बांधव तसेच परिसरातील सर्वच घटक समाज त्यांना पाठिंबा देत आहेत.

सध्या त्या बेळगाव ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्त्या तसेच आदिवासी आश्रम शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या आहेत. पंचायत राज व्यवस्था, शैक्षणिक प्रश्न, महिला हक्क, विकास कामे तसेच विविध निवडणुकांच्या काळात लोकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.

नागरिकांच्या आग्रहामुळे अपक्ष उमेदवारी: माध्यमांशी बोलताना राधाबाई सलाम म्हणाल्या, निवडणूक म्हटलं की पैसा पाहिला जातो, अटींची यादी पुढे आणली जाते. मी एक गरीब आदिवासी महिला आहे. पण जनतेचा जो प्रचंड प्रेमळ आग्रह आहे, त्याने मी भारावून गेले आहे. हेच माझे खरे बळ, हीच माझी कमाई आहे. त्यामुळे मी कोणत्याही राजकीय पक्षाची उमेदवारी मागणार नाही. पक्षपात न करता, जनतेच्या प्रेमाखातर मी अपक्ष म्हणून ही निवडणूक लढवणार आहे.

यामुळे मांडवी पंचायत समिती गणात निवडणुकीची रंगत वाढण्याची शक्यता असून सामाजिक कार्याच्या जोरावर निवडणूक रिंगणात उतरणाऱ्या राधाबाई सलाम यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष उमेदवार सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या प्रचार कार्यालयाचे भव्य उद्घाटन

किनवट /प्रतिनिधी

नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी दि२७ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या हस्ते पार पडले.



यावेळी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस नेत्या श्रीमती बेबीताई नाईक, युवानेते कपिल नाईक, ,माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, माजी जिल्हा परिषद सदस्य बंडु नाईक करण येंड्रलवार, तालुका प्रमुख मारोती दिवसे पाटील, ड. राहुल धनलाल नाईक, प्रकाश गब्बा राठोड, उपसभापती राहुल नाईक, संचालक अनिल पाटील क-हाळे, युवा नेते यश खराटे, प्रशांत कोरडे, अतुल दर्शनवाड, सौ. ललिता मुनेश्वर, मारोती मुनेश्वर, दैवशाला भालेराव यांच्यासह आघाडीतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर खासदार आष्टीकर यांनी शहरातील विविध प्रभागामध्ये व्यक्तिशः भेट देत लोकांशी संवाद साधला. नागरिकांना सौ. सुजाता येंड्रलवार यांच्याबाबत विश्वास व्यक्त करत विकासाच्या अपेक्षा मांडल्या. सौ. सुजाता येंड्रलवार यांनी किनवट शहराला लोकाभिमुख नेतृत्व देऊन पारदर्शक व विकासाभिमुख प्रशासनाचे लक्ष्य जाहीर केले. महाविकास आघाडीच्या प्रचारामध्ये महिलांचा व युवकांचा वाढता सहभाग हा या निवडणुकीतील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

# माहेर भायगाव येथे संविधान दिन साजरा; २६/११ च्या शूरवीरांना अभिवादन

बदनापुर: (प्रतिनिधी-संजय भुजाळ)तालुक्यातील माहेर भायगाव येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ग्रामपंचायत यांच्या विद्यमाने भारताचे संविधान आणि त्यातील मूलभूत कर्तव्ये यांची माहिती देणारा जनजागरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून झाली. ग्रामस्थांनी संविधानाची निर्मिती, महत्व आणि लोकशाही मूल्यांवर आधारित भाषणे सादर केली.



ग्रामस्थांनीही सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने जागरूक राहण्याचे आवाहन केले.

संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या शूरवीरांना अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी हुतात्म्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळले.

वक्त्यांनी शूरवीरांच्या अदम्य धैर्याची आठवण करून देत म्हटले की, संविधान आपल्याला अधिकार देत असताना देशाचे रक्षण करण्यासाठी अनेक वीरांनी प्राण अर्पण केले. त्यांचा त्याग भावी पिढीने सदैव स्मरणात ठेवावा.याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी हनुमान राऊत, सरपंच अर्जुन वाघ,मधुकर वाघ, एकनाथ पवार, दौलत वाघ, विलास खिल्लारे, संतोष शिंदे, उमेश गव्हाणे, सुनिता वाघ, सविता महेर तसेच इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# महायुती तर्फे भाजपा उमेदवार सौ. पुष्पाताई मच्छेवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन



किनवट /प्रतिनिधी

महायुती तर्फे भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पुष्पाताई आनंद मच्छेवार यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी संध्याकाळी बाबुलाल चौक येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले. उद्घाटन आ भिमराव केराम यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये माजी नगराध्यक्ष साजिद खान, माजी नगरसेवक सुरज सातुरवार, युवा नेते ड. प्रतिक केराम, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, जिल्हा सरचिटणीस प्रा. किशन मिरासे, राष्ट्रवादी कॉचे वैजनाथ करपुडे पाटील, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार, जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, राजेंद्र केशवे, मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, मंडळ अध्यक्ष उमाकांत क-हाळे पाटील, माजी तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार, सुगत नगराळे, शरद जैस्वाल, शेख खलिल, पुनम दिक्षित, नरसिंग तक्कलवार, अजय कदम, शिवाजी आंधळे, बालाजी धोत्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळकृष्ण कदम यांनी केले.

यावेळी आ. केराम, माजी नगराध्यक्ष साजिद खान व माजी नगरसेवक सुरज सातुरवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी भाजपा प्रशासनातील विकासकामांचा उल्लेख केला तसेच पुढील कार्य योजनेबाबत माहिती दिली. भाजपा उमेदवार सौ. पुष्पाताई मच्छेवार यांनी नागरी सुविधा, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, आरोग्य सुविधा व सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष केंद्रीत करून किनवट शहराचा विकास साधणार असल्याचा संकल्प व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रमात महायुतीच्या समर्थकांचा उत्साह, घोषणाबाजी आणि उमेदवारांसाठी जनसमर्थन यामुळे वातावरणात निवडणूक रंगत आणखीनच वाढताना पाहायला मिळाली.